# १ मुघल (साधने)

**इतिहासलेखनशास्त्र व साधने**

१. भारतीय भाषांतील साधने

२. परकीय भाषेतील साधने व परकीय प्रवाशांचे प्रवास वृत्तांत

३. पुरातत्त्वीय साधने

४. मुघल कालखंडातील प्रमुख इतिहासकार : अबुल फजल, अब्दुल कादीर बदायुनी, अब्दुल हमीद लाहोरी, फ्रान्सिस बर्नियर

## इतिहासलेखनशास्त्र व साधने

इतिहास म्हणजे केवळ गतकालीन राजकारण (Past Politics) असे इतिहासाचे मर्यादित स्वरूप आज राहिलेले नाही. इतिहास ही एक विकसित ज्ञानशाखा म्हणून पुढे आली आहे. हिरोडोटसपासून ते रँके, निबूर पर्यंतचा हा प्रवास आहे. गतकाळातील मानवाने आपल्या कर्तबगारीचे जे पुरावे मागे ठेवले त्यांना आपण साधने म्हणतो. या साधनांचे पुरातत्त्वीय व वाङ्मयीन साधने असे दोन मुख्य प्रकार पडतात. पुरातत्त्वीय साधनांमध्ये हत्यारे, अलंकार, शिलालेख, ताम्रपट, नाणी, चित्रे, किल्ले, विविध वास्तू यांचा समावेश होतो. तर वाङ्मयीन साधनांमध्ये बखरी, धर्मग्रंथ, प्रवासवर्णने, मजहर, करीने, वंशावळी, निवाडापत्रे, वैयक्तिक नोंदी, परकीय प्रवाशांचे वृत्तांत यांचा समावेश होतो.

वरील साधनांच्या आधारे भूतकाळातील इतिहास जाणून घेणे शक्य होते. इतिहास-लेखनासाठी साधनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रा. लॅंजिलॉस व प्रा. सेनबॉस कागदपत्रांचे महत्त्व सांगताना म्हणतात, 'No Documents No History'. कागदपत्रांचा शास्त्रशुद्ध रीतीने अभ्यास करून शास्त्रशुद्ध इतिहास आज मांडला जात आहे. राजकीय इतिहासाबरोबरच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रांमधील घटनांचा, कामगिरींचा, प्रगतींचा व त्यामागील कारणपरंपरांचा पुराव्याच्या आधारे इतिहास रेखाटला जात आहे.

१६ व्या शतकातील भारत लहान-लहान राज्यांत विभागला होता. या सत्तांमधील सततचा संघर्ष, लढाया यामुळे या सत्ता दुर्बल बनल्या होत्या. परकीय आक्रमणे थोपविण्याची क्षमता तत्कालीन एकाही राजकीय सत्तेमध्ये नव्हती. या परिस्थितीचा फायदा मुघल वंशीय बाबराने घेतला. त्याने इ.स. १५२६ मध्ये पानिपतच्या युद्धभूमीवर दिल्लीचा सुलतान इब्राहीम लोदी याचा पराभव करून भारतात मुघल सत्तेची स्थापना केली. इ.स. १७०७ पर्यंत ही सत्ता प्रबळ होती.



Scanned with CamScanner

**मुघलकालीन इतिहासाची साधने**

- **भारतीय भाषांतील साधने**
  - **फारसी भाषेतील साधने**
    - १. बाबरनामा
    - २. हुमायूननामा
    - ३. अकबरनामा
    - ४. तुझुक-इ-जहांगिरी
    - ५. पादशहानामा
    - ६. मासिरे आलमगिरी
    - ७. तारीखे खाफीखान
    - ८. तारीखे दिल्कुशा
    - ९. फुतूहाते आलमगिरी
    - १०. बुसातील-उस्-सलातीन
    - ११. खुतूते शिवाजी.
    - १२. तारीखे इराक्तखान
    - १३. मिराते अहमदी
    - १४. सियार उल् मुतख्खरीन
  - **मराठी भाषेतील साधने**
    - १. सभासद बखर
    - २. आज्ञापत्र
    - ३. चिटणीस बखर
    - ४. चित्रगुप्ताची बखर
    - ५. ९१ कलमी बखर
    - ६. संभाजी महाराजांची बखर
    - ७. राजाराम महाराजांची बखर
  - **संस्कृत भाषेतील साधने**
    - १. कविंद्र परमानंदाचे शिवभारत
    - २. राधामाधव विलासचंपू
    - ३. अनुपुराण
    - ४. पर्णालपर्वत ग्रहणाख्यान
    - ५. शिवराज्याभिषेक कल्पतरू
    - ६. राज्यव्यवहारकोष
    - ७. राजारामचरित्रम्
- **परकीय भाषेतील साधने व परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांत**
  - १. इंग्रजी साधने
  - २. पोर्तुगीज साधने
  - ३. फ्रेंच आणि डच साधने
  - **परकीय प्रवाशी**
    - १. जॉन फ्रायर
    - २. निकोलस मनुची
    - ३. अॅबे कॅरे
    - ४. विल्यम नॉरिस
- **पुरातत्त्वीय साधने**
  - १. किल्ले
  - २. शस्त्रास्त्रे व अवजारे
  - ३. राजवाडे व गढ्या
  - ४. नकाशा, आराखडे
  - ५. वस्त्रे व अलंकार
  - ६. चित्रे
  - ७. धातूंच्या मूर्ती, काष्ठशिल्प
  - ८. कालवे व बगीचे
  - ९. शिलालेख व ताम्रपट
  - १०. नाणी



मुघल इतिहासाची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. मुघल सम्राटांनी दरबारी मंडळीकडून लिखाण करवून घेतले तर बाबर, जहांगिर या सम्राटांनी स्वतः लेखन केले आहे. या कालखंडामध्ये अनेक परकीय प्रवाशांनीही भारतास भेटी दिल्या आहेत. त्यांच्या डायऱ्या, त्यांचे प्रवासवृत्तांत यामधूनही मुघल काळाची माहिती मिळते. परकीय प्रवाशांमध्ये निकोलस मनुची, बर्निअर, सर थॉमस रो, अॅबे कॅरे, जॉन फ्रायर यांचे प्रवासवृत्तांत महत्त्वपूर्ण आहेत. मुघल दरबारी लेखक अबुल फजल, बदायुनी, अब्दुल हमीद लाहोरी, साकी मुस्तैदखान, खाफीखान यांचे लेखन अत्यंत महत्त्वपूर्ण समजले जाते. या सर्व लेखकांच्या लिखाणातून मुघलांच्या राजकीय इतिहासाबरोबरच त्या काळातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश पडतो. मुघल काळात बलशाली मध्यवर्ती सत्तेच्या निर्मितीमुळे व्यापार, उद्योग, स्थापत्य, कला यामध्ये भरभराट झाली.

## भारतीय भाषांतील साधने

### (अ) फारसी भाषांतील साधने

फारसी साधनांतून मुघल साम्राज्याचा इतिहास रेखाटला गेला आहे. सम्राट बाबर, सम्राट जहांगिर हे स्वतः लेखक होते. त्यांनी स्वतःची आत्मचरित्रे लिहिली आहेत. अनेक इतिहासकारांना मुघल राज्यकर्त्यांनी राजाश्रय दिला होता. या इतिहासकारांनी जो इतिहास रेखाटला त्यातून मुघल कालखंडातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाची आपणास आज माहिती मिळते. या काळातील लिखाणात काही त्रुटी असल्या तरी प्राथमिक साधनांचा आधार घेऊन लेखन करणाऱ्या इतिहासकारांनी वास्तवतेचे दर्शन घडविले आहे.

**१. बाबरनामा :** मुघल साम्राज्याचा संस्थापक बाबर याने तुर्की भाषेमध्ये स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे. या ग्रंथास तुझुक-ए-बाबरी किंवा बाबरनामा असे म्हटले जाते. या ग्रंथाची चार वेळा फारसीत भाषांतरे झाली आहेत. बाबराची लेखनशैली साधी, सरळ व वाचकास खिळवून ठेवणारी आहे. लष्करी हालचाली व राजकीय घडामोडींचा परामर्श बाबराने घेतला आहे. बाबराने स्वतःचे दोषही मोकळेपणाने मांडले आहेत. काही वेळा या ग्रंथात अतिशयोक्तीही आली आहे.

बाबराने आपल्या आत्मचरित्रात भारतातील राजकीय परिस्थितीबरोबरच सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थितीचेही वर्णन केले आहे. तो म्हणतो, येथील मोठ्या नद्या व झरे सोडल्यास देशभर पाण्याचा अभाव आहे. येथे सुंदर व हवेशीर घरे नाहीत, बगिचे नाहीत, येथे चांगले घोडे, कुत्रे, द्राक्षे व टरबूज मिळत नाहीत. येथील बाजारही सामान्य दर्जाचे आहेत. भारतीय लोकांबाबत बाबर म्हणतो, येथे सौंदर्य दुर्मीळ आहे, येथील लोक सुंदर नाहीत, शेतकरी व खालच्या दर्जाचे लोक दारिद्र्यात जीवन जगतात. लोकांना नेसावयास पुरेसे वस्त्र नाही. तसेच येथे एकमेकांकडे जाण्याचा रिवाज नाही. तो म्हणतो, हा देश विशाल असूनही येथे सोने, चांदी मात्र विपुल आहे. येथे अनेक व्यावसायिक असून त्यांची संख्या मोठी आहे.

बाबराच्या लिखाणात सत्यांश फारच थोडा आहे. भारतातील त्याची अल्पकारकीर्द पाहता लष्करी मोहिमांमध्येच त्याचा बहुतांश वेळ गेला. भारतातील सुसंस्कृत लोकांच्या संपर्कात

Scanned with CamScanner

बाबर आला असता व त्यास आणखी काही काळ मिळाला असता तर त्याच्या मतामध्ये बदल झाला असता.

**२. हुमायूननामा :** हुमायूनची बहीण गुलशन बेगम हिने अकबराच्या आग्रहाने या ग्रंथाचे लेखन केले आहे. बाबर आणि हुमायून यांच्या कौटुंबिक जीवनाची माहिती या ग्रंथामधून मिळते. तसेच हुमायून त्याची राजसत्ता व सत्ताधारी वर्गाशी असणारे संबंध इत्यादीबाबतची माहितीही या ग्रंथात देण्यात आली आहे. मॅडम बेव्हरीजनी सदर ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर केले आहे.

**३. अकबरनामा :** अबुल फजलने प्राथमिक साधनांना महत्त्वपूर्ण स्थान देऊन या ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ तीन खंडांत लिहिला आहे. पहिल्या खंडात तैमुरपासून हुमायून-पर्यंतचा इतिहास दिला आहे. दुसऱ्या भागामध्ये सम्राट अकबराची कारकीर्द रेखाटली आहे. तर तिसरा भाग 'आइन-ए-अकबरी' म्हणून ओळखला जातो. मुघल कालखंडाचा व प्रामुख्याने अकबराचा इतिहास समजून घेण्यासाठी 'अकबरनामा' हा ग्रंथ अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**४. तुझुक-इ-जहांगिरी :** सम्राट जहांगिरने स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे त्यास 'तुझुक-इ-जहांगिरी' म्हटले जाते. जहांगिरने आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीचा १७ वर्षांचा इतिहास यात रेखाटला आहे. पुढील लिखाणाचे काम त्याने मुतामीद खान याच्याकडून करवून घेतले आहे. या ग्रंथामध्ये जहांगिरने मोकळेपणाने लिखाण केले आहे. मात्र काही घटनांबाबत (पित्याविरुद्धचे बंड, नूरजहानशी विवाह) अत्यंत त्रोटक माहिती त्याने दिली आहे. जहांगिरच्या कारकिर्दीची माहिती समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे.

**५. पादशहानामा :** पादशहानामा या नावाचे ग्रंथ कुझविनी, लाहोरी व महंमद वारीस या तिघांनी लिहिले आहेत. पैकी अब्दुल हमीद लाहोरी याचा ग्रंथ अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याने अनेक कागदपत्रांचा अभ्यास करून, शासकीय दप्तराचा आढावा घेऊन या ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ दोन खंडांमध्ये लिहिला आहे. तैमुरपासून शहाजहानपर्यंत सर्व मुघल वंशाचा इतिहास लाहोरीने दिला आहे. मनसबदारांची माहिती या ग्रंथात मिळते. शहाजहानचा कालखंड हा मुघल सत्तेच्या भरभराटीचा (सुवर्णयुग) काळ होता. या काळाचा इतिहास जाणून घेण्यासाठी लाहोरीचा पादशहानामा हा ग्रंथ अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**६. मासिरे आलमगिरी :** औरंगजेब बादशहाच्या दरबारातील अधिकारी असलेला साकी मुस्तैदखान हा या ग्रंथाचा कर्ता होय. औरंगजेब बादशहाच्या आयुष्यातील अनेक घटनांचा मुस्तैदखान हा साक्षीदार होता. इ.स. १७०९ मध्ये म्हणजेच औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अवघ्या दोनच वर्षांत त्याने हा ग्रंथ लिहिला आहे. मासिरे आलमगिरी या ग्रंथात लेखक साकी मुस्तैदखान औरंगजेबाचा पराक्रम विस्ताराने सांगतो, तर पराभवाचे वर्णन अतिशय त्रोटकपणे करतो. त्यामुळे मुघलांविषयीचा त्याचा पूर्वग्रह लक्षात घेऊनच या चरित्रग्रंथाचा इतिहास लेखनासाठी साधन म्हणून उपयोग केला पाहिजे.

इ.स. १८७१ मध्ये 'रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेने हा ग्रंथ प्रसिद्ध केला. जदुनाथ सरकार यांनी या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर केले तर सेतुमाधवराव पगडी यांनी या मूळ फारसी ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले.



**७. तारीखे खाफीखान :** या ग्रंथाचे मूळ नाव 'मुन्तखबुललुबावए महंमदशाही' असे आहे. त्यास खाफीखानचा इतिहास म्हणजेच 'तारीखे खाफीखान' असे म्हणतात. महंमद हाशिम खाफीखान हा औरंगजेब बादशहाचा एक लष्करी अधिकारी होता. औरंगजेबाच्या अनेक मोहिमांमध्ये तो हजर होता. मोहिमांमध्ये मुघलांची झालेली दुर्दशा, मराठ्यांचा पराक्रम, संभाजी महाराजांचा स्वभाव व धनाजी, संताजींचा पराक्रम इत्यादींची माहिती या ग्रंथामधून मिळते.

खाफीखानने अनेक लष्करी मोहिमा अनुभवल्या. मुघल-मराठा संघर्ष पाहिला होता. तो त्याने आपल्या लिखाणात रंगविला. **श्री. पगडी** त्याच्या लिखाणाबाबत म्हणतात, 'मुघलांची दुर्दशा खाफीखानाने लपवून ठेवली नाही. औरंगजेबाने सातारा, परळी, पन्हाळगड, विशाळगड, सिंहगड इत्यादी किल्ले घेतले. त्या मोहिमेत मुघल सैन्याची जी दुर्दशा झाली तिचे तपशीलवार वर्णन त्याने दिले आहे'

**८. तारीखे दिल्कुशा : भीमसेन सक्सेनाचा** हा चरित्रग्रंथ होय. तो औरंगजेबाच्या दक्षिणेच्या मोहिमेत होता. मराठ्यांबरोबरीचे अनेक समरप्रसंग लेखकाने स्वतः अनुभवले होते. इ.स १७०१ ते १७०९ या कालखंडात भीमसेन सक्सेनाने हे आत्मचरित्र लिहिले आहे. या ग्रंथात इ.स.१६५६ ते १७०९ पर्यंतचा इतिहास कथन केला आहे. औरंगजेब बादशहाच्या कालखंडाविषयी महत्त्वपूर्ण माहिती या ग्रंथामधून आपणास मिळते. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते महाराणी ताराबाई पर्यंतच्या मराठा राज्यकर्त्यांनी औरंगजेबाशी दिलेल्या संघर्षाची माहिती या ग्रंथात मिळते. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंडात मुघलांची मराठ्यांनी केलेली प्रचंड हानी, त्याचबरोबर बादशाही फौजांची झालेली दाणादाण लेखकाने प्रामाणिकपणे वर्णन केली आहे.

**९. फुतूहाते आलमगिरी** (आलमगीर विजय) : या ग्रंथाचा कर्ता **ईश्वरदास नागर** हा होय. फुतूहाते आलमगिरी म्हणजे आलमगीर औरंगजेब बादशहाच्या विजयाची कथा होय. इ.स.१६६० ते १७०० या चाळीस वर्षांच्या कालखंडात छावण्यांत, दरबारात जे घडले त्याचे संदर्भ या ग्रंथात आढळतात. आलमगीर बादशहाचे विजय रेखाटणे हा लेखकाचा उद्देश होता. त्यामुळे मुघल कालखंडाच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण मानला जातो.

ईश्वरदास नागर हा बादशहाच्या मुख्य न्यायाधीशाचा कारकून होता. मुख्य न्यायाधीश बादशहा समवेत सतत असल्यामुळे ईश्वरदासासही बादशहाच्या छावणीत वास्तव्य करावे लागत होते. अनेक मोहिमांत तो स्वतः उपस्थित असल्यामुळे ईश्वरदास नागर याचा 'फुतूहाते आलमगिरी' इतिहास अभ्यासकांना उपयुक्त वाटतो.

**१०. बुसातिन-उस्-सलातीन : मुहम्मद इब्राहिम अझ्झुबैरी** हा या ग्रंथाचा कर्ता होय. विजापूरच्या आदिलशाहीचा इतिहास त्याने लिहिला आहे. या ग्रंथाच्या लिखाणासाठी अझ्झुबैरीने फिरिश्ता, मुहम्मदनामा, अलीनामा, तारीखे खाफीखान इत्यादी ग्रंथांचा आधार लेखकाने घेतला आहे. या ग्रंथामुळे आदिलशाही-मुघल, आदिलशाही-मराठे यांच्या संबंधावर प्रकाश पडतो. १७ व्या शतकातील दक्षिणेतील राजकीय स्थितीचा आढावा यावरून आपणास घेता येतो.

Scanned with CamScanner

बुसातिन-उस-सलातीन या ग्रंथाचा मराठी अनुवाद 'विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास' या नावे मोडक व वझे यांनी प्रथम प्रसिद्ध केला. त्याचबरोबर ग.ह.खरे व वा.सी.बेंद्रे यांनीही या ग्रंथाचा अनुवाद केला आहे.

**११. खुतूते शिवाजी (शिवाजींची पत्रे) :** 'खुतूते शिवाजी' म्हणजे शिवाजी महाराजांची पत्रे होत. महाराजांच्या पत्रांबरोबरच औरंगजेब, शहाजादा अकबर, झुल्फिकारखान, शाहू महाराज यांचीही पत्रे आहेत. या पत्रांचा इंग्रजी अनुवाद सर जदुनाथ सरकार यांनी, तर मराठी अनुवाद श्री. पगडी यांनी 'मुघल-मराठा संघर्ष' या पुस्तकात प्रसिद्ध केला आहे. ही पत्रे म्हणजे इतिहासाचे अस्सल पुरावे आहेत. विश्वसनीय साधन म्हणून या पत्रांचा आधार घेतला जातो. शिवाजी महाराजांनी जिझीयाच्या निषेधार्थ औरंगजेबाला लिहिलेले महत्त्वपूर्ण पत्र यात देण्यात आले आहे.

**१२. तारीखे इरादतखान : मीर मुबारक उल्ला इरादतखान** हा या ग्रंथाचा कर्ता होय. या ग्रंथामध्ये शहाआलम बादशहापासून फारूखशियर बादशहापर्यंतची माहिती मिळते. औरंगजेब बादशहानंतरच्या मुघल कालखंडाच्या माहितीसाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. **कॅप्टन जे स्कॉट** यांनी या ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद केला आहे.

**१३. मिराते अहमदी : अली मुहम्मदखान** हा या ग्रंथाचा कर्ता असून इ.स.१७४८ मध्ये त्याने हा ग्रंथ लिहिला. लेखक गुजरात प्रांताचा दिवाण होता. त्यामुळे मुघलांच्या गुजरातमधील हालचाली त्याचबरोबर मराठ्यांनी गुजरातमध्ये केलेल्या स्वाऱ्यांचा वृत्तांत त्यास चांगल्या प्रकारे मांडता आला आहे. लेखक स्वतः मुलकी सेवेमध्ये असल्यामुळे त्याच्या लिखाणास चांगला दर्जा प्राप्त झाला आहे.

**१४. सियार उल् मुतखखरीन :** १७८२ च्या सुमारास सय्यद गुलाम हुसेन याने हा ग्रंथ लिहिला. छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यातील संघर्षाची माहिती यामधून मिळते. त्याचबरोबर निजाम व मराठे यांच्या राजकारणाची माहिती या ग्रंथामधून मिळते.

### (ब) मराठी भाषेतील साधने

मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासासाठी मराठी साधनांमध्ये बखरींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बखरीबरोबरच रोजनिशा, सनदपत्रे, मराठी रुमाल, ऐतिहासिक पत्रे इत्यादी कागदपत्रेही महत्त्वाची आहेत. 'बक' म्हणजे बोलणे या शब्दावरून 'बखर' हा शब्द निर्माण झाला असावा असे राजवाडेंचे मत आहे. महत्त्वपूर्ण 'खबरी' एकत्र करून मराठेशाहीत जे ग्रंथ पुढे आले ते म्हणजेच 'बखरी' होत. बखरकारांनी तत्कालीन इतिहास शब्दबद्ध केला. स्वराज्याच्या उदयापासून बखरींच्या लिखाणास सुरुवात झाली. इतिहासाबरोबरच वाङ्मयीनदृष्ट्याही बखरींना महत्त्वाचे स्थान आहे. अनेक प्रसंग रंगविताना बखरकारांनी अतिशयोक्ती केली असली तरी ऐतिहासिक सत्य आपणास नजरेआड करता येणार नाही.

बखरींचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात येते.



१. चरित्रात्मक : उदा. सभासद बखर, चिटणीस बखर, ९१ कलमी बखर, संभाजी महाराजांची बखर, राजाराम महाराजांची बखर.

२. आत्मचरित्रात्मक : उदा. नाना फडणीसांचे आत्मचरित्र.

३. युद्धवर्णनात्मक : उदा. पानिपतची बखर.

४. प्रसंगवर्णनात्मक : उदा. ब्रह्मेंद्रस्वामींच्या निधनाची बखर.

५. वंशवर्णात्मक : उदा. जेधे शकावली, पेशव्यांची बखर.

६. सांप्रदायिक : उदा. हनुमंत स्वामींची बखर.

## १. सभासद बखर

**कृष्णाजी अनंत सभासद** हा या बखरीचा कर्ता होय. मराठ्यांच्या इतिहासातील ही सर्वांत जुनी बखर होय. सभासद हा शिवाजी महाराजांचा समकालीन होता. महाराजांच्या जीवनातील अनेक घटना त्याने स्वतः पाहिल्या होत्या. सभासद शिवकालातील घटनांचा साक्षीदार होता. **राजाराम महाराज** म्हणतात, ' आपले पिता थोरले राजे यांनी इतका पराक्रम केला व चार पादशाहींशी दावा लाविला ऐसा पराक्रम केला. ऐसे असता औरंगजेब येऊन किल्लोकिल्ली अनर्थ मांडिला. या अर्थ काय?' हे सर्वांना ज्ञात होण्यासाठी कृष्णाजी अनंत सभासद या जुन्या माहीतगाराकडून इ.स.१६९७ मध्ये राजाराम महाराजांनी ही बखर लिहून घेतली. इ.स. १८८१ मध्ये वि.का.साने यांनी या बखरीची पहिली मराठी आवृत्ती काढली. इ.स.१९२० मध्ये कलकत्ता विद्यापीठाने सभासद बखरीचे इंग्रजीत प्रकाशन केले. शिवकाळातील अत्यंत महत्त्वपूर्ण व विश्वसनीय पुरावा म्हणून सभासद बखरीकडे पाहिले जाते.

सभासद बखरीमध्ये महाराजांच्या पूर्वजांपासून ते त्यांच्या अंतापर्यंत एकूण १४ प्रकरणे दिली आहेत ती याप्रमाणे

१. पूर्वजवृत्तांत व शिवाजीराजांचा कार्यारंभ
२. शिवाजीराजे व अफजलखान
३. प्रतापगडावर देवीची स्थापना व कारभार व्यवस्था
४. शायिस्तेखान व राजा जयसिंग यांची स्वारी
५. शिवाजीराजांचे आग्र्यास जाणे व येणे
६. आदिलशाहाशी युद्ध
७. शिवाजीराजांचा मुघलांशी तह व बिघाड
८. आदिल व मुघलशाहीशी युद्ध
९. आदिलशाहीशी युद्ध
१०. शिवाजीराजे यांस राज्याभिषेक
११. संभाजी व शिवाजीराजे भेट
१२. व्यंकोजी व संभाजी
१३. शिवाजीराजांच्या राज्याची मोजदाद
१४. राजियांचे देहावसन

Scanned with CamScanner

सभासदाने या १४ प्रकरणांच्या माध्यमातून 'शिवछत्रपतींचे चरित्र' मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यामधून महाराजांच्या जीवनातील अनेक महत्वाच्या प्रसंगांवर प्रकाश पडतो. सभासद बखरीचे मूल्यमापन खालीलप्रमाणे -

१. अतिशय महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या या बखरीत शिवाजी महाराजांची जन्मतिथी देण्यात आलेली नाही. शहाजीराजांच्याविषयीही अगदी त्रोटक माहिती सभासद देतो. तो म्हणतो, 'जिजाऊ तिचे पोटी राजश्री शिवाजीराजे पुत्र होताच श्री शंभू महादेव जागृती येऊन स्वप्न झाले की, आपणच आहो'. याबरोबरच शहाजीराजांना स्वप्नी पुढील दृष्टांतही झाला. "बारा वर्षांपर्यंत तुम्ही आपले जवळ ठेवावे, पुढे न ठेवणे. जातील तिकडे जाऊ देणे, आरोप न करणे". यामुळे शहाजीराजे पुणे प्रांती दादोजी कोंडदेवाबरोबर शिवाजींची रवानगी करतात.

२. सभासद 'शिवाजी-अफजलखान' प्रकरणात शिवाजी महाराजांनी भेटीस जाण्यापूर्वी केलेली तयारी, एकमेकांच्या वकिलांमार्फत केलेली बातचीत व खेळलेले डावपेच सभासदाने दिलेले आहेत. प्रत्यक्ष भेटीमध्ये अफजलखानाने कसा दगा दिला व महाराजांनी प्रसंगावधान राखून खानास कसे मारले याची अगदी क्रमवार माहिती सभासदाने दिलेली आहे. याचबरोबर भेटीनंतर खानाच्या फौजेची उडालेली दाणादाण, शत्रूकडून मिळालेले घोडे, उंट, जडजवाहीर यांची माहिती सभासदाने दिलेली आहे.

३. 'सभासद' ही पदवी असून हिरेपारखी हे कृष्णाजी अनंताचे मूळ आडनाव होय. शिवाजी महाराजांपासून राजाराम महाराजांपर्यंत त्यांनी राजदरबारी सेवेत काम केले. महाराजांच्याविषयी सभासदाला अत्यंत आदर आहे. अतिशय विनम्रपणे सभासदाने बखरीचे लिखाण केले आहे. त्याचे लिखाण अलंकृत असले तरी अतिशयोक्ती टाळण्याचा त्याने प्रयत्न केला आहे.

४. सभासदाने महाराजांची प्रशासनव्यवस्था (मुलकी व लष्करी) किल्ले, खजिना इत्यादींची माहिती सभासद बखरीत दिली आहे.

५. 'शिवाजीच्या राज्याची मोजदाद' या प्रकरणामध्ये १८ कारखाने व १२ महाल यांची माहिती देण्यात आली आहे. तसेच शिवपूर्वकाळातील ४९ किल्ल्यांची, शिवाजी महाराजांनी बांधलेल्या १०८ किल्ल्यांची (पश्चिम महाराष्ट्र) व कोकणातील ४१ किल्ल्यांची व कर्नाटकातील ७९ किल्ल्यांची माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे. यावरून गडकोटांची माहिती मिळविणे अत्यंत सुलभ झाले आहे.

६. पश्चिम किनारपट्टीच्या संरक्षणासाठी शिवाजी महाराजांनी आरमार उभे केले. महाराजांच्याकडे दोन आरमारी तुकड्या व ४०० युद्धनौका होत्या. आरमाराच्या बाबतीत महाराज किती दक्ष होते हे सभासद सांगतो. मात्र परकीयांशी आलेल्या संबंधाचा उल्लेख सभासदाने दिलेला नाही.

७. सभासद महाराजांच्या जीवनातील अनेक घटनांचा साक्षीदार असला तरी त्याचे लिखाण स्मृतीवर आधारित असल्याने लिखाणात घटना, स्थळ, काळ यांचा क्रम दिसून येत नाही.

८. शिवाजी महाराजांच्या मृत्यूचा उल्लेख करताना सभासद भावविवश झालेला दिसतो. तो म्हणतो, 'त्या दिवशी पृथ्वीकंप जाहला. गगनी धूमकेतू उदेला. उल्कापात आकाशातून



झाला. रात्री जोड इंद्रधनुष्ये निघाली. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्री शंभू महादेवी, तळ्याचे उदक रक्तमय झाले. पाण्यातील मत्स्य बाहेर पडून आभासवर्णी उदक जाहाले. ऐशी आरिष्टे जाहली'.

९. सभासद राजियांच्या चरित्राबद्दल आग्रहाने सांगतो, 'हे पुण्यश्लोक राजियाचे चरित्र जे वाचतील त्यास मोठे पुण्य जोडेल. निपुत्रिकांस पुत्र होतील व दरिद्रियांस लक्ष्मीवंत होतील व भाग्यवंत होतील'.

सभासद बखरीचे मूल्यमापन करताना **जदुनाथ सरकार** म्हणतात, "But the Sabhasad's book is still the most valuable source of information on national hero from the Maratha Site. The proof is that later bakhar writers who could find no other source of such usefulness have borrowed extersively from it".

## २. आज्ञापत्र

रामचंद्रपंत अमात्यांना आज्ञापत्राचे लेखक असे संबोधले जाते. शिवकालात या घराण्याचा उदय झाला. निळो सोनदेव हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. मात्र रामचंद्र अमात्याने स्वकर्तृत्वाने घराण्याचा नावलौकिक वाढविला. इ.स.१८७५ ते १८९१ या काळात **'विविध ज्ञानविस्तार'** या मासिकामधून आज्ञापत्र प्रसिद्ध झाले. वाङ्मयीनदृष्ट्या या ग्रंथाचे मूल्य अनन्यसाधारण आहे.

शिवाजी महाराजांपासून ते ताराबाईपर्यंतच्या कालखंडात रामचंद्रपंत अमात्यांनी मराठी राज्याची सेवा केली आहे. संभाजी महाराजांच्या काळात त्यांना फारसे स्थान मिळाले नाही. मात्र संभाजी महाराजांच्या हत्येनंतर उद्भवलेल्या बिकट परिस्थितीत मराठी राज्याचे औरंगजेबाच्या आक्रमणापासून रक्षण करण्याची अवघड जबाबदारी अमात्यांनी पार पाडली. राजाराम महाराज जिंजीला अडकले असताना महाराष्ट्रात मराठी राज्य सावरण्याची कामगिरी रामचंद्र अमात्यांनी यशस्वीपणे पार पाडली. या अतुलनीय कामगिरीबद्दल राजाराम महाराजांनी त्यांना 'हुकूमतपन्हा' हा किताब देऊन गौरव केला. अमात्यांनी या ग्रंथामध्ये नऊ प्रकरणे दिलेली आहेत. त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे -

▶ **प्रकरण पहिले :** यामध्ये या ग्रंथाचा ध्येय-उद्देश देण्यात आला आहे. शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्याची स्थापना त्यांना आलेल्या अडीअडचणी आणि महाराजांनी त्यावर केलेली मात यांचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

▶ **प्रकरण दुसरे :** शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत छ.संभाजी व छत्रपती राजाराम महाराजांनी कसे टिकविले यांचे वर्णन, सततच्या युद्धप्रसंगामुळे स्वराज्याची व मराठी माणसांची झालेली ससेहोलपट इत्यादी बाबींचे वर्णन अमात्यांनी या प्रकरणात दिले आहे.

▶ **प्रकरण तिसरे :** यामध्ये तीर्थस्थळे, मंदिरे, समाधीस्थळे याबाबतची राजाची कर्तव्ये कशा स्वरूपाची आहेत याचा ऊहापोह केला आहे. त्याचबरोबर राज्याचा खजिना, त्याबाबत घ्यावयाची दक्षता आणि फौज व शस्त्रास्त्राबाबत घ्यावयाची खबरदारी याचे विश्लेषण या प्रकरणात अमात्यांनी केले आहे.

Scanned with CamScanner

▶ **प्रकरण चौथे :** या प्रकरणामध्ये राजाच्या कर्तव्याची लांबलचक यादी देण्यात आली आहे. राजाने कारभारात दक्ष असावे. विश्वासू माणसांना जवळ करावे. स्वःसंरक्षणासाठी अत्यंत सावध असावे. एखाद्या सेवकाचा संशय आल्यास त्याला तत्काळ दूर करावे. याच प्रकरणात प्रधानाच्या निवडीबाबत अमात्यांनी लिहिले आहे. प्रधान हे राज्याच्या रक्षणाचे आधारस्तंभ आहेत म्हणून त्यांच्याकडे कुलीनता, शूरत्व, उद्योगीपणा, सामंजस्य व दूरदृष्टी असावी. या प्रधानांच्या मदतीनेच राजा राज्यकारभार चालवित असतो. अमात्यांनी शुक्रनीतीसारमधील **'राजा कालस्य कारणम्'** या उक्तीची आठवण करून दिली आहे.

▶ **प्रकरण पाचवे :** या प्रकरणामध्ये सावकार व व्यापारी यांच्याबाबतची माहिती देण्यात आली आहे. **अमात्य म्हणतात,** 'साहुकार (सावकार) म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा होय'. राज्य आर्थिकदृष्ट्या सबल करण्यात सावकार व व्यापारी यांचा मोठा सहभाग असतो म्हणून त्यांचा मंगलप्रसंगी राजाने सन्मान करावा. राज्याच्या भरभराटीमध्ये यांचे योगदान किती महत्त्वाचे आहे याचे विवेचन अमात्यांनी केलेले आहे.

याच प्रकरणामध्ये अमात्य म्हणतात की, इंग्रजांसारख्या घरघेऊ व्यापारांशी सावधगिरीने वागावे. युरोपियनांना खाडीच्या तोंडाशी समुद्रतिरी वखारीसाठी जागा देण्यात येऊ नये, तसेच त्यांना इमारती बांधण्यास परवानगी देऊ नये. युरोपियनांना व्यापारी सवलती देण्या भविष्यकाळातील धोका अमात्यांना उमगला होता. तो त्यांनी आज्ञापत्राच्या रूपाने दाखवू दिला पण भारतीय राज्यकर्त्यांनी यापासून बोध घेतल्याचे दिसून येत नाही.

▶ **प्रकरण सहा :** पाटील, कुलकर्णी, देशमुख इत्यादी वतनदारांचा राजाने आद करावा. त्यांची वतने नष्ट करू नयेत. त्यांच्याकडून राजाने राज्याची सेवा करून घ्यावी. वतनाच्या आशेने ते कामगिरी पार पाडतात. मात्र हे वतनदार डोईजड होणार नाहीत याची काळजी राजा घ्यावी. अन्यथा तं राज्याच्या मार्गात अडसर ठरू शकतात.

▶ **प्रकरण सात :** या प्रकरणात राज्याच्या महसुलाविषयी विवेचन करण्यात आ आहे. महसूल कमी होणे हा राज्याचा व राज्यलक्ष्मीचा पराभव आहे असे अमात्य सांगतात त्याचबरोबर भूमीचे दान कोणास द्यावे याविषयीही त्यांनी लिहिले आहे. **अमात्य म्हणतात** 'राजास भूपती असे भूमीकरिता म्हणावे ते भूमीच गेल्यावर राज्य कशाचे करणार? पति कोणाच होणार? धर्मार्थ भूमिदान देणे हे पुण्यकर्म असले तरी धर्मार्थ भूमीचे दान देताना विशेष दक्षता घ्यावी. थोर जागृत देवस्थाने, सत्पुरुषांचे मठ, समाधीस्थाने, जेथे पूजा, नैवेद्य, यात्रा, अन्नशां नियमित चालते अशा स्थळांस ग्राम अथवा भूमीचे दान द्यावे. स्वधर्म विरोधी, पाखंडी लोकां ग्राम अथवा भूमीचे दान देऊ नये'.

▶ **प्रकरण आठ :** यामध्ये गडकोटाविषयी घ्यावयाची काळजी, त्यावरील अधिकारी त्यांची कामे इत्यादींची माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे. **अमात्य म्हणतात, 'संपू राज्याचे सार ते दुर्ग', 'गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी'** राजाने जागोजागी गडकोट उभे करावे जे आहेत ते दुरूस्त करावेत, त्यांची व्यवस्था ठेवावी. ज्याच्या ताब्यात गडकोट त्याच्या ताब्य आसपासचा टापू (प्रदेश) म्हणजेच राज्यरक्षणामध्ये किल्ल्यांना अनन्यसाधारण असे स्थान आहे



अमात्य म्हणतात, किल्ल्यावरील अधिकारी , हवालदार, सबनीस, कारखानीस, तटरक्षक जे कोणी असतील ते अत्यंत विश्वासू असावयास हवेत. ५ वर्षांदरम्यान त्यांच्या बदल्या व्हाव्यात तसेच किल्ल्याच्या आसपासचे लोक किल्ल्यावर नोकरीस ठेवू नयेत. किल्ल्याच्या मुलखातील वतनदारांना किल्ल्यावर सेवा सांगण्यात येऊ नये, असे अमात्य सांगतात. त्याचबरोबर किल्ल्यावर सांडपाण्याची व्यवस्था हवी, स्वच्छता ठेवावयास हवी. कचरा जागोजागी जाळावा. पाणीपुरवठ्याची तजवीज करावी. गडावरील झाडांचे संगोपन करावे त्याचबरोबर किल्ल्यांच्या संरक्षणासाठी कोणती काळजी घ्यावी याबाबत अमात्यांनी तपशीलवार माहिती दिली आहे.

▶ **प्रकरण नववे : ''ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र''**असे सांगून अमात्यांनी या प्रकरणाची सुरुवात केली आहे. सागरी किनारपट्टीच्या संरक्षणासाठी आरमार आवश्यक असून ते नेहमी दक्ष ठेवावे. आरमार एकाच ठिकाणी न ठेवता ते विखरून ठेवावे. आरमाराभोवती गस्त ठेवण्यात यावी. दरवर्षी आरमारी छावणीमध्ये बदल करण्यात यावा. त्याचबरोबर शत्रूबाबत दक्ष असावे. टेहळणीसाठी समुद्रात जहाजे फिरती ठेवावीत. परकीयांना परवानगीशिवाय समुद्रावर प्रवेश देऊ नये. आरमाराच्या उभारणीसाठी सागाची झाडे तोडावीत मात्र आंबा, फणस असे फळ देणारे वृक्ष तोडू नयेत आणि आवश्यकता वाटल्यास त्या झाडांचा मोबदला रयतेस द्यावयास हवा. आरमाराच्या वाढीसाठी रयतेस वेठीस धरू नये. अशा अनेक उपयुक्त सूचना अमात्यांनी आपल्या 'आज्ञापत्रात' केलेल्या आहेत.

'आज्ञापत्र' हा राजनीतीवरील एक श्रेष्ठ ग्रंथ आहे. राजा त्याची कर्तव्ये, राज्यकारभाराविषयक धोरण, आर्थिक धोरण, व्यापारी धोरण, वतनदारांसंबंधीचे धोरण इत्यादींचे विवेचन या ग्रंथात करण्यात आले आहे. या ग्रंथातील बारकावे व सूक्ष्म विवेचन पाहता या ग्रंथाचा कर्ता हा तेवढाच मुत्सद्दी असला पाहिजे हे निर्विवाद. 'आज्ञापत्राचा' लेखक कोण याबद्दल वाद आहे. स्वतःसाठी व आपल्या वंशजासाठी नवीन वतने मागणारा रामचंद्रपंत अमात्य नवीन वतने व ती वंशपरंपरेने मुळीच देऊ नयेत. असे कसे काय लिहू शकतो ? असा प्रश्न काही इतिहासकारांनी मांडला आहे. नीळकंठ मोरेश्वर पिंगळे हा मुख्य प्रधान आज्ञापत्राचा कर्ता असावा असा एक विचार आहे. याबाबत असा वाद असला तरी 'आज्ञापत्र'चा कर्ता म्हणून रामचंद्रपंतांचेच नाव घेतले जाते.

## आणखी इतर काही साधने

**३. चिटणीस बखर : मल्हार रामराव चिटणीस** हा या बखरीचा कर्ता होय. शिवकाळातील खंडो बल्लाळांच्या घराण्यातील तो वंशज होता. इ.स.१८११ मध्ये त्याने सात प्रकरणांच्या माध्यमातून आपली बखर रंगविली. सातारच्या छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारी नोकरीत असतानाच त्याने ही बखर पूर्ण केली. सातारच्या संस्थानाशी त्याचा जवळून संबंध आल्यामुळे व अस्सल कागदपत्रांचा त्यास आधार घेता आल्यामुळे त्याचे लिखाण महत्त्वपूर्ण मानले जाते.

**४. चित्रगुप्ताची बखर : रघुनाथ यादव चित्रगुप्त** (चित्रे) हा या बखरीचा कर्ता होय. ही बखर सभासद बखरीवर आधारित आहे. बखरींच्या आधारावर बखर लिहिण्याची पद्धत

Scanned with CamScanner

१८ व्या शतकात असलेली दिसून येते. या बखरीचे मूल्यमापन करताना इतिहासाचार्य वि.का.राजवाडे म्हणतात, 'सभासद बखरीत ज्या पुरुषांची आडनावे दिली नाहीत त्यांचे आडनावे चित्रगुप्त लिहिण्याच्या झोकात सहजासहजी देतो व कधी-कधी वर्णनात सभासद बखरीत जी नावे मुळीच नाहीत, ती ही नव्यानेच देतो'. यावरून इतिहासाच्या अभ्यासकांच्या दृष्टीने या बखरीचे महत्त्व लक्षात येते.

**५. ९१ कलमी बखर :** ही बखर **दत्ताजी त्र्यंबक वाकेनवीस** यांनी लिहिली. या बखरीत ९१ कलमे आहेत. मालोजीराजांपासून शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास यात कथन केला आहे. १९३० च्या दरम्यान इतिहास संशोधक वि.स.वाकसकरांनी ९१ कलमी बखर प्रकाशित केली. शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग लेखकाने रंगविले आहेत. छ. शिवाजींचा इतिहास समजून घेण्यासाठी ९१ कलमी बखर एक महत्त्वपूर्ण साधन ठरली आहे.

**६. संभाजी महाराजांची बखर : मल्हार रामराव चिटणीस** हा या बखरीचा कर्ता होय. संभाजी महाराजांचे चरित्र रेखाटण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. दरबारी मंडळींचा संभाजीराजांना असलेला विरोध, त्यावर संभाजीराजांनी केलेली मात, अकबराने औरंगजेब बादशहाच्या विरुद्ध केलेले बंड, अकबरास संभाजीराजांनी दिलेला आश्रय आणि मुलाचे बंड निपटून टाकण्यासाठी व दक्षिणेतील सत्ता नाहीशा करण्यासाठी औरंगजेब बादशहाचे आक्रमण यांचा वृत्तांत चिटणिसांनी आपल्या बखरीत दिलेला आहे. लेखकाने संभाजी महाराजांच्या जीवनातील अनेक विवादास्पद प्रसंग रंगविले आहेत. मराठ्यांच्या तसेच मुघल इतिहासाच्या अभ्यासकांसाठी ही बखर महत्त्वपूर्ण मानली जाते.

**७. राजाराम महाराजांची बखर :** याही बखरीचा कर्ता **मल्हार रामराव चिटणीस** होय. छत्रपती राजाराम महाराजांबद्दल सविस्तर माहिती या बखरीतून उपलब्ध होते. संभाजी राजाराम कालखंडातील अनेक घटनांचा आढावा या बखरीमध्ये घेण्यात आला आहे. राजाराम महाराजांचे जिंजीला प्रयाण, झुल्फिकारखानचा किल्ल्याला वेढा, महाराष्ट्रातील स्वातंत्र्ययुद्ध इत्यादींबाबतची माहिती मल्हार रामराव चिटणिसाने दिलेली आहे. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या मागोवा घेण्यासाठी ही बखर अतिशय उपयुक्त मानली जाते.

### (क) संस्कृत भाषेतील साधने

१७ व्या व १८ व्या शतकात फारसी, उर्दू व प्रादेशिक भाषांचा प्रभाव असला तरी अनेक संस्कृत पंडितांनाही राजाश्रय होता. यामुळे कवी परमानंद, जयराम पिंड्ये, अनिरुद्ध सरस्वती, धुंडिराज लक्ष्मण व्यास व केशव पंडित यासारखे रचनाकार उदयास आले. या संस्कृत पंडितांच्या रचनांमधून तत्कालीन इतिहास अभिव्यक्त होतो.

**१. कविंद्र परमानंदाचे शिवभारत :** या काव्यग्रंथाचा कर्ता कवी परमानंद होय. ग्रंथात ३२ अध्याय असून यामध्ये मालोजीराजे, शहाजीराजे यांच्यापासून ते १६६१ पर्यंतचा शिवचरित्राचा यात आढावा घेतला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिवाजी महाराजांनी



केलेली स्वराज्याची स्थापना, आदिलशाही व बादशाही सरदारांची स्वराज्यावरील आक्रमणे व महाराजांनी त्यांचा केलेला पाडाव याची माहिती या ग्रंथामधून मिळते. इतिहास संशोधक **स.म.दिवेकर** यांनी १९२७ साली हा ग्रंथ संपादित केला. या ग्रंथाबाबत ते म्हणतात, "शिवाजी महाराजांचे विस्तृत व विश्वसनीय असे जे चरित्र भविष्यकाळी लिहिले जाईल त्याचा गाभा प्रस्तुतचा शिवभारत ग्रंथ ठरणार आहे. याबद्दल आम्हास यत्किंचितही शंका वाटत नाही".

**२. राधामाधवविलासचंपू :** हा काव्यग्रंथ **जयराम पंडित** यांनी इ.स.१६६४ च्या सुमारास बंगळूर येथे शहाजीराजांच्या दरबारी लिहिला. शहाजीराजांचे चरित्र हा या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. मुघल व आदिलशाही आक्रमणापासून निजामशाही वाचविण्याचा शहाजींचा प्रयत्न, स्वतःच्या कर्तबगारीने निजामशाही, आदिलशाही दरबारात निर्माण केलेला ठसा यांची माहिती या ग्रंथामधून येते. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी या ग्रंथाची पोथी शोधून काढून ती प्रसिद्ध केली.

**३. अनुपुराण :** अनुपुराण हा काव्यग्रंथ **कवी परमानंद** यांनी रचला असे मानले जाते. परंतु इतिहासकार **शेजवलकर** म्हणतात की, "शिवभारत व अनुपुराणाची भाषाशैली भिन्न असल्यामुळे परमानंदाचा पुत्र देवदत्त हा अनुपुराणाचा कर्ता असावा" या ग्रंथात भोसले कुळाचा काव्यमय इतिहास शहाजीराजांपासून ते संभाजी महाराजांपर्यंत दिलेला आहे.

**४. पर्णाल पर्वतग्रहणाख्यान : जयराम पंडित** यांनी या ग्रंथाची रचना केली आहे. पर्णाल म्हणजे पन्हाळा. पन्हाळा विजय हा या काव्याचा विषय आहे. **स.म.दिवेकरांनी** हा ग्रंथ प्रकाशित केला असून इ.स.१६७४ मध्ये या ग्रंथाची रचना झाली असावी असे दिवेकर म्हणतात.

**५. शिवराज्याभिषेक कल्पतरू :** या ग्रंथाचा कर्ता **गोविंद नारायण बर्वे** हा होय. गोविंद आणि निश्चलपुरी यांच्यातील राज्याभिषेकाबाबतचा संवाद (विशेषतः दुसरा राज्याभिषेक) हा या ग्रंथाचा विषय आहे. गागाभट्टाचा वेदोक्त राज्याभिषेक चुकीचा असून निश्चलपुरीचा तांत्रिक राज्याभिषेक कसा योग्य होता हे या ग्रंथात मांडण्यात आले आहे.

**६. राज्यव्यवहार कोष :** शिवाजी महाराजांच्या आज्ञेनुसार या ग्रंथाची रचना **रघुनाथ नारायण हणमंते** यांच्या मार्गदर्शनाखाली **धुंडिराज लक्ष्मण व्यास** या पंडिताने केली. या ग्रंथात अनेक फारसी संज्ञांना संस्कृत संज्ञा सांगण्यात आल्या आहेत. फारशी भाषेचे मराठीवर झालेले आक्रमण थोपविणे हा या ग्रंथाचा प्रमुख उद्देश आहे.

**७. राजाराम चरितम् :** राजाराम महाराजांच्या पदरी असणाऱ्या केशव पंडित यांनी इ.स. १६९० च्या सुमारास या ग्रंथाची रचना केली. संभाजी महाराजांच्या हत्येनंतरच्या परिस्थितीचा केशव पंडित साक्षीदार होता. औरंगजेबाच्या आक्रमणामुळे राजाराम महाराजांना जिंजीला आश्रय घ्यावा लागला होता. राजाराम महाराजांचा जिंजीचा प्रवास लेखकाने स्वतः अनुभवला असल्याने ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण साधन म्हणून या ग्रंथाचा उल्लेख करावा लागतो.

## परकीय भाषांतील साधने व परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांत

**(अ) इंग्रजी साधने :** इंग्रजांनी सुरत, मुंबई, राजापूर, धरणगाव, कारवार, मद्रास, कलकत्ता इत्यादी अनेक ठिकाणी आपल्या वखारी उघडल्या. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या नियंत्रणाखाली

Scanned with CamScanner

असलेल्या वखारींशी मुघलांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आला. वखारवाल्यांनी मुघलांच्य हालचाली, मोहिमा, त्यांचे राजकारण इत्यादीं विषयीची महत्त्वपूर्ण माहिती लिहून ठेवली होती इंग्रज व्यापारी स्वतः माहिती गोळा करत. त्याचबरोबर गुप्तहेरांकडून बातम्या गोळा करत. इंग्र आपल्या व्यापार संरक्षणासाठी हे सर्व करत होते. या कागदपत्रांमधून मुघलांचा तारीखवा इतिहास लिखाणास मदत झाली आहे.

इंग्रजांचा पत्रव्यवहार 'फॅक्टरी रेकॉर्ड' म्हणून ओळखला जातो. 'हिस्टॉरिकल फ्रॅगमेंट' र रॉबर्टच्या ग्रंथामध्ये मुघल-मराठ्यांच्या इतिहासाविषयी बरीच माहिती मिळते. शिवराज्याभिषे प्रसंगी उपस्थित असणाऱ्या हेन्री ऑक्झिडेन यांच्या रोजनिशीमधूनही महत्त्वाची माहिती मिळ श्री. वा.सी.बेंद्रे यांनी लंडनमधील 'इंडिया हाऊस'मधील असंख्य कागदपत्रांचे उतारे नकलांच स्वरूपात मिळविले. त्यांचे २०-२२ अप्रकाशित खंड भारत इतिहास संशोधक मंडळाकडे ज आहेत. मुघल कालखंडाचा इतिहास जाणून घेण्यासाठी या कागदपत्रांचा उपयोग महत्त्वा आहे.

ब्रिटिशांनी मुघल बादशहाकडून व अन्य भारतीय सत्ताधीशांकडून वखारीसाठी परवान मिळविली होती. ब्रिटिशांच्या व्यापारी सनदा व त्यांचा व्यापार इत्यादीविषयीची माहिती ब्रिटिशांच रेकॉर्डवरून मिळते. या काळातील राजकीय परिस्थिती, भारतीय सत्ताधीशांमधील हेवेदा लढाया यावरती इंग्रजी साधनांमधून प्रकाश पडतो.

**(ब) पोर्तुगीज साधने :** पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने इ.स.१४९८ म भारतात पाऊल ठेवले. अनुकूल परिस्थितीचा फायदा घेत पोर्तुगिजांनी गोवा, साष्टी, बार इत्यादी ठिकाणी आपल्या वखारी उघडल्या. भारतीय सत्ताधीशांशी त्यांचे अनेक वेळा सं उडाले. त्यामुळे तत्कालीन राजकारणाचे पडसाद पोर्तुगिजांच्या कागदपत्रात उमटले.

लिस्बन आणि एव्होरा येथे असणाऱ्या दप्तरखान्यामधून मुघल इतिहासास उपयुक्त अस शेकडो कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. लिस्बनच्या प्रमुख दप्तरखान्यास **'तोर्रिदु तों** (Toreedo Tombo) असे म्हणतात. या लिस्बनच्या दप्तरखान्यामधून मध्ययुगीन भारता इतिहासाची अतिशय उपयुक्त माहिती उपलब्ध होते. तत्कालीन राजकीय परिस्थिती, व्याप धर्म व संस्कृती इत्यादींवर माहिती मिळते. एवढेच नव्हे तर, शिवाजी महाराजांचे परकीय भा चरित्र लिहिण्याचा पहिला मान एका पोर्तुगीज लेखकाकडे जातो. इ.स.१६९५ मध्ये **'क्रोस्मि ग्वार्द'** याने शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले.

**(क) फ्रेंच आणि डच साधने :** मुघल-मराठ्यांच्या इतिहासास उपयुक्त ठरणारी अ फ्रेंच पत्रे पॅरिस व लंडन येथील दप्तरखान्यात आहेत. तत्कालीन इतिहास जाणून घेण्यासाठी पत्रांचा फार उपयोग होतो. फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याने लिहिलेली रोजनिशी म्हणजे १७ व्या शतका उत्तरार्धाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. या रोजनिशीचे इंग्रजी भाषांतर जदुनाथ सरकार य प्रसिद्ध केले. शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहीम, राजाराम काळातील औरंगजेबाचा स झुल्फिकारखानाने जिंजीच्या किल्ल्यास दिलेला वेढा इत्यादीबाबतची अतिशय महत्त्वाची मा मार्टिनच्या रोजनिशीत सापडते.



डचांनी इ.स.१६०५ मध्ये मच्छलीपट्टण येथे वखार स्थापन केली. त्या पाठोपाठ सुरत, वेंगुर्ला, कोरोमंडल, मलबार इत्यादी समुद्रकिनारी वखारी स्थापन केल्या. डच व पोर्तुगीज यांच्यात राजकीय वैर असल्यामुळे डच हिंदी राज्यकर्त्यांना पोर्तुगिजांविरुद्ध मदत करत असत. डचांचा सर्व पत्रव्यवहार ॲमस्टरडॅमला 'वेस्ट इंडियन स्कॉलर्स हाऊस' मध्ये संकलित केला आहे.

## मुघल कालखंडातील परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांत

मुघल कालखंडामध्ये अनेक परकीय प्रवासी भारतात आले. त्यांनी आपली प्रवासवर्णने शब्दबद्ध केली आहेत. त्यापैकी महत्त्वपूर्ण प्रवाशांचा भारतभेटीचा कालखंड व त्यांचा देश.

१. विलियम हॉकिन्स (इ.स.१६०८-१६१३), इंग्लंड
२. निकोलस विथिंगस्टन (इ.स.१६१२-१६१६)
३. पियेत्रो देलावाले (इ.स.१६२३-१६२५), इटाली
४. जीन बौप्टिस्ट ट्रॅव्हर्निअर (इ.स.१६४१-१६६८), फ्रान्स
५. फ्रान्सिस बर्निअर (इ.स.१६५६-१६६८), फ्रान्स
६. निकोलस मनुची (इ.स.१६५६-१७१७), इटाली
७. जॉन फ्रायर (इ.स.१६७२-१६८१), इंग्लंड
८. ॲबे कॅरे (इ.स.१६६८ आगमन), फ्रान्स
९. विल्यम नॉरिस, इंग्लंड

**१. ट्रॅव्हर्निअर :** शहाजहानच्या कालखंडात या फ्रेंच प्रवाशाने भारताला भेट दिली. त्याने व्यापाराच्या निमित्ताने सर्व हिंदुस्थानभर भ्रमंती केली. भारताच्या विविध प्रांतांमधील जलमार्ग, व्यापारीमार्ग, व्यापारपेठा यांची माहिती त्याने दिली आहे. त्याचबरोबर विविध प्रदेशांमधील हवामान, पाऊस, पिके यांचीही माहिती तो देतो. ट्रॅव्हर्निअरच्या प्रवासाचा हेतूच व्यापाराची माहिती मिळविणे हा असल्याने राजकीय वर्णनात त्याने फारसे स्वारस्य दाखविले नाही. भौगोलिक व व्यापारी दृष्टीने ट्रॅव्हर्निअरचा प्रवासवृत्तांत महत्त्वाचा आहे.

**२. निकोलस मनुची :** शहाजहान कालखंडात वयाच्या १७ व्या वर्षी भारतात आलेला हा इटालियन प्रवासी होय. १६५६ मध्ये तो सुरतला आला. पुढे बऱ्हाणपूरमार्गे दिल्लीस आला. दारा शुकोव्हची त्याने मर्जी संपादन केली. यामुळे मनुचीला प्रवासासाठी अनेक सवलती मिळाल्या. त्याने दारा शुकोव्ह, राजा जयसिंग, औरंगजेब, पोर्तुगीज, इंग्रज इत्यादींच्या पदरी नोकरी केली. या काळात त्याने जे अनुभवले त्याचा वृत्तांत त्याने 'Storio do Mogor' (मोगलाचा इतिहास) या नावे प्रसिद्ध केला. तर त्याचे मराठी भाषांतर 'असे होते मुघल' या नावाने श्री.ज.स.चौबळ यांनी केले आहे. मनुचीने आपल्या प्रवासवर्णनात अनेक महत्त्वाचे प्रसंग रंगविले आहेत. औरंगजेबाने सत्ता हाती घेऊन शहाजहानला तुरुंगात टाकले व त्याचे हाल केले. मनुचीने अनेक

Scanned with CamScanner

वेळा तुरुंगात जाऊन शहाजहानची भेट घेतली. त्याच्या हाल-अपेष्टांचे वर्णन करताना मनुची म्हणतो, "तुरुंगात इतक्या भयंकर हाल-अपेष्टा प्रत्यक्ष बादशहाला सहन कराव्या लागत असतील असे मला वाटले नव्हते. परंतु प्रत्यक्ष तुरुंगाला भेट दिल्यानंतर मला सत्य परिस्थितीची कल्पना आली. शहाजहानला अनन्वित यातना सहन कराव्या लागल्या, ही गोष्ट माझ्या डोळ्यांनीच मी पाहिली. शहाजहानचा गुलाम ऐतबारखान यालाच शहाजहानची व्यवस्था ठेवण्याचे कार्य दिलेले होते. परंतु बादशहाच्या आज्ञेवरून त्याला शहाजहानचा तुरुंगवास अत्यंत त्रासदायक आणि कष्टकारक करावा लागला".

**३. जॉन फ्रायर :** जॉन फ्रायर इ.स.१६७२ ते ८१ या काळात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा सर्जन म्हणून काम पाहत होता. त्याने रायगड, मुंबई, जुन्नर, कारवार, गोवा, कोकण इत्यादी ठिकाणांना भेटी दिल्या. राज्याभिषेक प्रसंगी तो रायगडावर हजर होता. राज्याभिषेक प्रसंगाचा तो महत्त्वपूर्ण साक्षीदार होता. राज्याभिषेकाचे जॉन फ्रायरने केलेले चित्रण वास्तववादी आहे. ब्रिटिश आणि मुघल संबंधाबाबतची माहिती जॉन फ्रायरच्या प्रवासवर्णनामधून मिळते.

**४. ॲबे कॅरे :** ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी इ.स.१६६८ च्या सुमारास सुरत, गोवा, दमण, चौल, राजापूर इत्यादी ठिकाणी गेला होता. अनेक तत्कालीन राजकीय घडामोडींचा आढावा त्याने आपल्या प्रवासवर्णनात घेतला आहे. इतिहास अभ्यासकांना हे प्रवासवर्णन अतिशय उपयुक्त आहे.

**५. विल्यम नॉरिस :** ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी मुघल बादशहाकडून व्यापारी सवलती मिळवित. मिळालेल्या सवलतींचे नूतनीकरण करण्याचे कामही त्यांना करावे लागे. असेच काम घेऊन विल्यम नॉरिस इंग्लंडहून भारतात आला. तो सुरतेस उतरला. पुढे औरंगाबाद शहागड, ब्रह्मपुरी, मिरज करत करत तो कोल्हापूरकडे आला. बादशहा पन्हाळ्यास वेढा देऊन बसला होता. पन्हाळ्याजवळील छावणीतच विल्यम नॉरिसने मुघल बादशहाची भेट घेतली.

विल्यम नॉरिस मायदेशी गेल्यानंतर त्याने आपला प्रवासवृत्तांत लिहिला. यामध्ये बादशहाच्या छावण्या, त्यांची संरक्षण व्यवस्था, मुघल सरदारांमधील हेवेदावे, त्यांच्यातील वैर आणि मराठ्यांचा पराक्रम इत्यादीविषयींची माहिती नमूद केली आहे. स्वतः अनुभवलेल्या अनेक गोष्टींची नोंद त्याने आपल्या प्रवासवर्णनात केलेली आहे. भारतीय इतिहास जाणून घेण्यासाठी परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांत महत्त्वपूर्ण ठरतात.

## पुरातत्त्वीय साधने (Archaeological Sources)

लिखित साधनांप्रमाणेच मुघल कालखंडाच्या इतिहासाची पुरातत्त्वीय साधनेही महत्त्वाची आहेत. या साधनामुळे तत्कालीन इतिहासाचा मागोवा घेणे अभ्यासकांना सोईचे झाले आहे. मुघल काळातील स्थापत्य तर भारताच्या इतिहासाचा मानबिंदू ठरला आहे. पुरातत्त्वीय साधने खालीलप्रमाणे -



| | |
|---|---|
| १. किल्ले | ६. चित्रे |
| २. शस्त्रास्त्रे व अवजारे | ७. धातूंच्या मूर्ती, काष्ठशिल्प |
| ३. राजवाडे व गढया | ८. कालवे व बगीचे |
| ४. नकाशा, आराखडे | ९. शिलालेख व ताम्रपट |
| ५. वस्त्रे व अलंकार | १०. नाणी. |

**१. किल्ले :** मध्ययुगीन भारताच्या इतिहासात किल्ल्यांना अनन्यसाधारण असे महत्त्व होते. किल्ले हे राज्याचे संरक्षक होते. हिंदुस्थानात ५०० किल्ले असून त्यातील उत्तर भारतात १०४ तर दक्षिण भारतात ३८० किल्ले आहेत. किल्ल्यांचे मुख्यत: तीन प्रकार असून त्यात डोंगरी किल्ला (गिरीदुर्ग), जलदुर्ग व भुईकोट किल्ला यांचा समावेश होतो.

शेरशहाने यमुना नदीच्या काठावर 'पुराणा किल्ला' बांधला. तर अकबराने 'आग्र्याचा किल्ला' तसेच 'लाहोरचा किल्ला' यांचे बांधकाम केले. हे दोन्ही किल्ले एवढे प्रचंड असून आजही ते चांगल्या स्थितीत आहेत. त्याचबरोबर अकबराने अजमेर, मेरठ, कटक इत्यादी ठिकाणी किल्ले बांधले. शहाजहानने इतिहासप्रसिद्ध 'लाल किल्ल्याचे' बांधकाम केले.

शिवाजी महाराजांनी किल्ल्याचे महत्त्व ओळखून रायगड, प्रतापगड, सिंहगड, राजगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग इत्यादी किल्ले उभारले. या किल्ल्यांवर अनेक वास्तूंची निर्मिती केली. किल्ल्याचे तट, बुरूज, त्यावरील तोफा, दारूगोळ्याची कोठारे, इमारती, वाडे, मंदिरे, बाजारपेठा इत्यादींचे अवशेष इतिहासाची साक्ष देत आजही उभे आहेत.

**२. शस्त्रास्त्रे व अवजारे :** शस्त्रास्त्रे व सैन्यबळावर राज्ये मोठी होत होती, वाढत होती. मध्ययुगीन कालखंडाचा तो न्याय होता. ज्याच्याकडे शस्त्रास्त्रे अवजारे व लढाईचे तंत्र चांगल्या प्रकारचे असेल तो सरस ठरत होता. या काळातील शस्त्रास्त्रांत ढाल-तलवार, भाला, धनुष्यबाण, कट्यार, खंजीर, दांडपट्टा, सुरा-बरचा, वाघनखे, बंदूक व तोफा यांचा समावेश होतो. महत्त्वपूर्ण किल्ल्यावरील अवजड तोफा आजही आपणास पाहावयास मिळतात. अनेक शस्त्रास्त्रांवर कालखंड नोंदविलेला आहे. अनेक वस्तुसंग्रहालयांमधून ही शस्त्रास्त्रे पाहावयास मिळतात.

**३. राजवाडे, गढ्या :** मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील अनेक राजवाडे त्यांच्या वैभवाची साक्ष देतात. मुघल व रजपूत राजांनी अतिशय भव्य असे राजवाडे बांधले. त्यांच्या संरक्षणासाठी खंदक खोदून भक्कम तट बांधले. या राजवाड्यांमध्ये अनेक दालने असून, राज्यांचे वेगळे महाल, राजकुमार व राजकुमारींची दालने, दास-दासींच्या निवासाची सोय त्याचबरोबर संरक्षणासाठी असलेल्या सैनिकांची राहण्याची व्यवस्थाही त्यामध्ये असे.

दिल्ली, आग्रा, शहजहानाबाद (दिल्ली), फत्तेपूरसिक्री, दतिया, अंबर येथील राजवाडे महत्त्वपूर्ण आहेत. राजा जयसिंगाने जयपूर येथे हवामहल बांधला, तर पहिल्या बाजीरावाने पुणे येथे शनिवारवाडा बांधला. सातारा, कोल्हापूर येथील राजवाडे प्रसिद्ध आहेत. याच काळात अनेक ठिकाणी भुईकोट किल्लेवजा गढ्यांची उभारणीही झाली. अनेक संस्थानिक, जहागीरदारांनी गढ्या उभारल्या त्यांच्या बांधकामात दगड, मातीचा वापर असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणावर पडझड झालेली आहे.



Scanned with CamScanner

**४. नकाशा, आराखडे :** ज्या भूप्रदेशावर राज्य करावयाचे त्याचा भूगोल माहीत असणे गरजेचे असते. मुघल कालखंडात साम्राज्य दर्शविण्यासाठी अनेक नकाशे बनविण्यात आले. अनेक व्यापारी मार्गांचे आराखडे बनविण्यात आले. याबाबतीतील युरोपियनांचे योगदान महत्त्वाचे आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाकडे, पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या दप्तरखान्यात अनेक नकाशे उपलब्ध आहेत. डेक्कन कॉलेजमध्ये फ्रेंच विद्वान सॅमसन डी. ॲबिव्हेल यांचा इ.स. १६५४ मधील मुघल साम्राज्य दर्शविणारा नकाशा उपलब्ध आहे. नकाशे, युद्ध, आराखडे याबाबतीत मुघल कालखंडात फारशी प्रगती झाली नव्हती. याबाबतीतील साधने अतिशय त्रोटक आहेत.

**५. वस्त्रे व अलंकार :** मुघल काळात कापड उद्योग भरभराटीत होता. उडीसा, गुजरात, बंगाल हे प्रांत कापडनिर्मितीत अग्रेसर होते. तर रेशमी कापडासाठी पैठण, आग्रा, खंबायत ही ठिकाणे प्रसिद्ध होती. या काळातील पुरुषांची वेशभूषा चुडीदार पायजमा, अंगरखा, दुपट्टा असा होता. पगड्यांचे अनेक प्रकार अस्तित्वात होते. प्रत्येक मुघल बादशहाच्या पगडीत वेगळेपण दिसून येतो. त्याचबरोबर पेशवाई पगडी, शिंदेशाही पगडी प्रसिद्ध आहे. तर स्त्रियांच्या बाबतीत घागरा, ओढणी प्रसिद्ध होती. बुरखा पद्धत व पडदा पद्धतीचा अवलंब मुघल काळात केला जात होता.

मध्ययुगीन काळात अलंकारांत मोठी विविधता होती. या काळातील अनेकविध स्वरूपाचे अलंकार, वस्त्रे, पगड्या वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आलेल्या आहेत. या काळातील इतिहास या छोट्या-मोठ्या साधनांमधून व्यक्त होतो.

**६. चित्रे :** मुघल कालखंडात चित्रकलेची भरभराट झाली. या कालखंडात चित्रकलेचा कल नवनिर्मितीपेक्षा वास्तवतेकडे असलेला दिसतो. बाबराने भारतात येताना अनेक पर्शियन चित्रकार आपल्यासोबत आणले. या वेळी त्याच्याकडे २४० चित्रे होती. हुमायून हा चित्रकलेचा चाहता होता. अकबराने तर अनेक चित्रकारांना राजाश्रय दिलेला होता. आठवड्यातून एक दिवस चित्रांचे प्रदर्शन भरवून बादशहाकडून ते बक्षिसे मिळवीत. जहांगिर तर स्वतः चित्रकार होता. शहाजहानच्या काळात चित्रकलेस पठारावस्था आली व औरंगजेबाच्या कालखंडात ती संपुष्टात आली. मुघल काळातील चित्रांमध्ये राजा, त्याचा दरबार, त्यांच्या जीवनातील प्रसंग, त्याचबरोबर निसर्ग चित्रे, प्राणिपक्षी इत्यादींचा समावेश होतो. या काळात चित्रकलेचा विकास झाला असला तरी सामान्य माणूस केंद्रस्थानी कधी नव्हता.

**७. धातूंच्या मूर्ती, काष्ठशिल्प :** इस्लाम धर्मप्रथानुसार मूर्तिपूजेला स्थान नसल्याने मूर्तिकलेला काही मर्यादा पडल्या. अकबराच्या काळात आग्रा किल्ल्याच्या महाद्वारावर चितोडच्या जयमलची हत्तीवरती आरूढ झालेली मूर्ती उभारली गेली. औरंगजेब हा मूर्तिकलेचा द्वेष्टा असल्याने त्याने अनेक ठिकाणच्या मूर्ती नाहीशा केल्या.

काष्ठ म्हणजे लाकूड. काष्ठशिल्प म्हणजे लाकडावरील शिल्पकला होय. ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती सुरक्षित ठेवण्यासाठी लाकडी पेट्यांचा उपयोग केला जात असे. अहिल्याबाई होळकरांचा नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील वाड्याचे कोरीव खांब म्हणजे काष्ठकलेचा उत्कृष्ट नमुना होय.



**८. कालवे व बगीचे :** रजपूत व मराठे सत्ताधीशांनी अनेक धार्मिक स्थळांच्या ठिकाणी घाट बांधले आहेत. शेती पाण्याखाली आणण्यासाठी बंधारे, कालवे खोदण्यात आले. रजपूत राजांनी जोधपूर, उदयपूर, बिकानेर, जयपूर इत्यादी ठिकाणी बगीचे तयार केले. तर मुघल राज्यकर्त्यांनी काश्मीर, दिल्ली, आग्रा येथे बगीचे तयार केले. आजही या बागा अस्तित्वात आहेत.

**९. शिलालेख व ताम्रपट :** शिलालेख व ताम्रपट ही महत्त्वपूर्ण पुरातत्त्वीय साधने होत. किल्ला, मंदिर, तलाव इत्यादी ठिकाणी शिलालेख कोरलेले आढळून येतात. रायगडच्या किल्ल्यावर शिलालेख पाहावयास मिळतो. विजयनगरच्या इतिहासाची साक्ष देणारे अनेक शिलालेख आढळून येतात. कुंभलगढ येथील शिलालेखामधून राजस्थानच्या इतिहासाची उपयुक्त माहिती मिळते. मध्ययुगीन काळात कर्नाटकात अनेक शिलालेखांची निर्मिती झालेली दिसते. तंजावरच्या बृहदेश्वराच्या मंदिरातील शिलालेखावरून भोसले घराण्याची वंशावळ मिळते.

ताम्रपट हे ही इतिहास जाणून घेण्याचे महत्त्वाचे साधन आहे. राजाकडून मिळणारे वतन व इनामी जमीन काही वेळा ताम्रपत्रावर दिली जात असे. वा. सी. बेंद्रे यांनी शिलालेख, ताम्रपट यांची माहिती देणारा A Story of Muslim Inscriptions नावाचा ग्रंथ लिहिला आहे.

**१०. नाणी :** इ.स.१५२६ मध्ये बाबराने दिल्ली ताब्यात घेऊन इस्लाम सत्तेची स्थापना केली. बाबर आणि हुमायून या दोघांनाही स्थिरता लाभली नाही. त्यांनी रुप्याची व तांब्याची नाणी बनविली.

शेरशहाच्या कालखंडात नाण्यांमध्ये महत्त्वपूर्ण भर पडली. त्याने मिश्र धातूंची नाणी बंद केली व सोन्याचा टंक, चांदीचा रुपया व तांब्याचा पैसा अशी नाणी तयार केली. शेरशहाच्या नाण्यांवर कलमा दिसून येतात. ही प्रथा मुघल कालखंडात सुरू असलेली दिसून येते. जोपर्यंत भारतीय चलनात रुपया आहे तोपर्यंत शेरशहाची आपणास आठवण येत राहील.

सम्राट अकबराने शेरशहासारखेच रुपया हे नाणे चालू ठेवले. त्याच्या नाण्यावर 'रुपया' असा उल्लेख आढळतो. अकबराच्या नाण्यांवर वर्ष, कलमा व काही वचने दिलेली आहेत.अकबराने टंका हे तांब्याचे नाणे सुरू केले. दिन-ए-इलाही धर्माच्या स्थापनेनंतर त्याने जी नाणी पाडली त्यावर 'अल्लाह अकबर जल जलालु' हे शब्द कोरण्यात आले आहेत. अकबराने इसवी सनाची मोजणी आपल्या राज्यारोहणाच्या इलाही वर्षात केली. नाण्यांवर फारसी महिन्यांची नावे छापली. असे म्हटले जाते की, अकबराची नाणी ज्यास गोळा करावयाची असतील त्याने बारा महिन्यांची बारा नाणी गोळा करावीत. अकबराच्या काळातच नाण्यांवर पडद्यामध्ये नाव, मजकूर देण्याची प्रथा सुरू झाली. अकबर दौऱ्यावर असतानाही त्याच्यासोबत एक फिरती टांकसाळ असे.

जहांगिरच्या कालखंडात दर महिन्यांची नाणी काढली जात आणि त्यात राज्यवर्षाचा मजकूर सनमध्ये दिला जाई. जहांगिरच्या नाण्यांवर राशींची चित्रे दिली जात. सिंह, बैल, वृश्चिक इत्यादी आकृत्या त्याच्या नाण्यावर कोरलेल्या असत. काही नाण्यांवर फुले, पाने यांची चित्रे

Scanned with CamScanner

पाहावयास मिळतात. जहांगिरने काही नाण्यांवर अर्धपद्मासनात असलेली स्वतःची आकृती कोरली तर या नाण्याच्या पृष्ठभागामध्ये सूर्य व सभोवती लेख दिला आहे. त्याने आपल्या अखेरच्या काळात नूरजहानच्या नावेही नाणे पाडले.

शहाजहानच्या काळात जुन्याच पद्धतीच्या नाण्यांचा स्वीकार करण्यात आला. शहाजहानच्या काळात नाण्याच्या एका बाजूस कलमा व टांकसाळीचे नाव आणि दुसऱ्या बाजूस बादशहाचे नाव व पदवी देण्यात येई. दानधर्म व भेट देण्यासाठी 'निसार' नावाचे नवीन नाणे जहांगिरने चलनात आणले.

औरंगजेबाच्या कालखंडात सततच्या युद्ध मोहिमांमुळे आर्थिक चणचण निर्माण झाली. त्यामुळे रुपयाचे मूल्य घसरले. औरंगजेबाने पाडलेल्या नाण्यांवर 'शाह अलमगीर बादशहा गाझी', असा उल्लेख आहे.

मुघल काळातील नाणी सोने, चांदी, तांबे यांची बनविली जात. या काळातील नाणी म्हणजे सोने-चांदीचे ठरावीक वजनाचे तुकडे असलेले दिसतात. बाजारामधील सोन्या-चांदीच्या भावांनुसार त्यांची किंमत ठरविण्यात येत असे. त्या काळात आग्रा, लाहोर, दिल्ली, अहमदाबाद या ठिकाणी टांकसाळी होत्या तर महाराष्ट्रात अहमदनगर, सोलापूर, विजापूर इत्यादी ठिकाणी टांकसाळी होत्या.

महाराष्ट्रात १७ व १८ व्या शतकात विजयनगर, आदिलशाही, निजामशाही, बादशाही या सर्वांची नाणी वापरात होती. सोन्या-चांदीच्या बाजारभावात त्यांचा विनिमय दर असल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होत नव्हती. शिवाजी महाराजांनी सोन्याचा होन व तांब्याचे शिवराई हे नाणे पाडले. या नाण्यांवर एका बाजूस श्री राजा शिव व दुसऱ्या बाजूस छत्रपती अशी अक्षरे होती. ६ जून, १६७४ रोजी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. या मंगलप्रसंगी वरील नाणी पाडण्यात आली. महाराजांची टांकसाळ रायगडावर होती. त्यांनी आपल्या राज्याभिषेकापासून 'सार्वभौमत्वाचे' प्रतीक म्हणून 'राज्याभिषेक शक' ही नवीन कालगणना सुरू केली.

छ. शाहू महाराजांनी सातारा येथे टांकसाळ सुरू करून शाहू शिक्का नावाने ओळखला जाणारा रुपया तयार केला. शिवाजी महाराजांनी सुरू केलेली नाणी पुढे पेशवाई काळात सुरू राहिली. मात्र पेशव्यांनी अनेक सावकारांना नाणी पाडण्याचे परवाने दिले. त्या मोबदल्यात ठरावीक महसूल पेशवे दरबारी भरावा लागत होता. ठरावीक पट्टी देऊन शिंदे, होळकर, आंग्रे, नागपूरचे भोसले आदींनी टांकसाळी सुरू केल्या. मराठी सत्तेच्या कालखंडातील नाणी मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, औंध, नागपूर इत्यादी ठिकाणच्या वस्तुसंग्रहालयात पाहावयास मिळतात.

१२ व्या शतकात मध्य भारतात राज्य करणाऱ्या गोंड राजांची नाणी सापडली आहेत. मुघल कालखंडाच्या पूर्वी दिल्लीवर राज्य करणाऱ्या सुलतानांनी सोन्याची नाणी काढलेली होती. दिल्लीचा पहिला सुलतान महंमद घोरी याने आपल्या सोन्याच्या नाण्यावर एका बाजूस



स्वतःचे नाव तर दुसऱ्या बाजूस लक्ष्मीचे चित्र दिले होते. तर चांदी व तांबे या मिश्र धातूंच्या नाण्यावर एका बाजूस घोडेस्वार तर दुसऱ्या बाजूस नंदीचे चित्र दिले होते. या सर्व गोष्टी आपणास अजब वाटल्या तरी राज्यकर्ते जुन्या नाण्यांच्या आधारावरच नवीन नाणी काढत असत. दक्षिण भारतातील अनेक राज्यकर्त्यांची नाणी उपलब्ध आहेत. त्यावर राजांची नावे, त्यांच्या पदव्या, देवदेवतांची चित्रे आपणास पाहावयास मिळतात.

- **युरोपियनांची नाणी :** मुघल कालखंडातच युरोपियन लोक व्यापारासाठी भारतात आले. पोर्तुगिजांनी १५१० मध्ये गोवा आपल्या ताब्यात घेतला. आपल्या राज्यासाठी त्यांना स्वतःच्या नाण्यांची आवश्यकता वाटू लागली आणि या गरजेमधूनच त्यांनी टांकसाळ सुरू करून सोने, चांदी व तांब्याची नाणी पाडली. पोर्तुगिजांच्या नाण्यांवर एका बाजूस क्रॉस तर दुसऱ्या बाजूस वर्तुळ देण्यात आले आहे. इ.स.१६३९ मध्ये चंद्रगिरीच्या राजाकडून मद्रासपट्टन (मद्रास/चेन्नई) इंग्रजांच्या ताब्यात आले. या वेळी प्रचलित नाण्याच्या धर्तीवर नाणी पाडण्याची परवानगी इंग्रजांनी मिळविली. या नाण्यावर भगवान विष्णू व त्यांच्या दोन्ही पत्नींची चित्रे दिसतात. पुढे इ.स.१६६५ मध्ये पोर्तुगीज राजाने इंग्लंडच्या राजास मुंबई बेट आंदण दिले. तर इंग्लंडच्या राजाने या बेटाचे अधिकार ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीस देऊ केले. कंपनीने मुघलांच्या पद्धतीनुसार तिसरा विल्यमराजा व राणी मेरी यांच्या नावाने फारसी लिपीत नाणी पाडली. मात्र औरंगजेब बादशहास याचा सुगावा लागताच त्याने इंग्रजांना चांगलेच खडसावले. परिणामतः इंग्रजांना आपली टांकसाळ बंद करावी लागली. ब्रिटिशांनी शेवटी व्यापार विनिमयासाठी बादशहा फर्रुखसियरकडून मुघली नाणी पाडण्याची परवानगी मिळविली.

ब्रिटिशांनी इ.स.१८३१ मध्ये इंग्रजी पद्धतीची तांब्याची नाणी पाडली. १८३५ मध्ये चौथ्या विल्यमच्या नावे व चित्रासहित चांदीचे नाणे पाडले. रुपया, आठ आणे, चार आणे हे चांदीचे तर दोन पैसे, पैसा व पै (पैशाचा तिसरा भाग) ही तांब्याची नाणी होती. इ.स.१८६२ मध्ये व्हिक्टोरिया राणीच्या कारकिर्दीत दोन आण्याचे चांदीचे नाणे पाडण्यात आले. ते १९१७ पर्यंत चलनात होते. सम्राट पाचव्या जॉर्जच्या काळात आठ आणे, चार आणे, दोन आणे या चांदीच्या नाण्याऐवजी निकेलची नाणी चलनात आली. त्यातील धातू त्याच्या मूल्याच्या दृष्टीने अगदी कमी किमतीचा होता. म्हणून या नाण्यास 'टोकन' नाणे असे म्हणतात. किंमत कमी असून देखील राजाच्या साक्षीमुळे (वचन) ते स्वीकारलेले असते. सहाव्या जॉर्जच्या कालखंडात पितळेची नाणी चलनात आली तर सातव्या एडवर्डच्या काळात प्रथमच एक आण्याचे नाणे चलनात आले. इ.स.१९४२ मध्ये अर्ध्या आण्याचे नवीन नाणे पाडण्यात आले. शेरशहापासून सुरू झालेला चांदीचा रुपया दुसऱ्या महायुद्धापर्यंत म्हणजे इ.स.१९३९ पर्यंत अस्तित्वात होता. आज चांदीच्या रुपयाची जागा निकेल आणि तांबे या मिश्र धातूंच्या रुपयाने घेतली आहे.

## मुघल कालखंडातील प्रमुख इतिहासकार

मुघल कालखंडाचा इतिहास शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न अनेक इतिहासकारांनी केला आहे. राजाश्रय लाभल्यामुळे फारशी भाषेतील लिखाणास मोठी चालना मिळाली. या लेखकांनी

Scanned with CamScanner

तत्कालीन कागदपत्रांचा अभ्यास केला. अनेक घटनांचे ते साक्षीदार होते. यामुळे त्यांच्या लिखाणाचा दर्जा चांगला राहिला आहे. मुघल कालखंडाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इत्यादी मागोवा घेण्यासाठी फारसी भाषेतील साधने महत्त्वाची आहेत. फारसी बरोबरच इतर मराठी, संस्कृत, हिंदी, बंगाली भाषेमध्ये लिहिली गेलेली साधने ही महत्त्वाची आहेत. परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांतही उपयुक्त आहेत. बाबराने स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे तर जहांगिरने अनेक ग्रंथ लिहून तत्कालीन इतिहास कथन केला आहे. स्वतः मुघल बादशहांनी केलेले लिखाणही या कालखंडातील उल्लेखनीय बाब होय. मुघल काळातील महत्त्वाचे लेखक व त्यांचे ग्रंथ पुढीलप्रमाणे :-

| अ. क्र. | लेखक | ग्रंथ |
|---|---|---|
| १. | बाबर | बाबरनामा (बाबराचे आत्मचरित्र) |
| २. | गुलबदन बेगम | हुमायूननामा |
| ३. | अब्बासखान शेरवानी | तारीख-ए-शेरशाही |
| ४. | मिर्झा हैदर | तारीख-ए-रशिदी |
| ५. | जोहर आफताबी | तझकीरात-उल-वाकीयात |
| ६. | अबुल फजल | अकबरनामा<br>ऐन-ए-अकबरी<br>रिलायसे मुनाजात<br>जामेयल्लूगात<br>मकतूबाते अल्लामी (पत्रसंग्रह) |
| ७. | अब्दुल कादर बदायुनी | मुन्तखब-उल-तवारिख (तीन खंड)<br>रज्मनामा (महाभारताचे फारसी भाषांतर) |
| ८. | खाजा निजामुद्दीन अहमद | तबका-ए-अकबरी |
| ९. | जहांगिर | तुझूक-ए-जहांगिरी<br>जहांगिरनामा,वाकीयत-ए-जहांगिर<br>इकबालनामा,मलाकन-ए-जहांगिर,<br>दायाज-ए-जहांगिर |
| १०. | अब्दुल हमीद लाहोरी | पादशहानामा |
| ११. | साकी मुस्तैदखान | मासिरे-ए-आलमगिरी |
| १२. | महंमद हाशिम खाफीखान | तारीख-ए-खाफीखान |
| १३. | मिर्झा कासीम | आलमगीरनामा |
| १४. | तारीखे दिल्कुशा | भीमसेन सक्सेना |

पुढे चालू



| | | |
|---|---|---|
| १५. | फुतूहाते आलमगिरी | ईश्वरदास नागर |
| १६. | खितूते शिवाजी | मराठा-मुघल पत्रसंग्रह |
| १७. | लुफ्तल्लाखानची पत्रे | लुफ्तल्लाखान |
| १८. | हफ्त अंजूमन | उदयनराजे (मिर्झा राजे जयसिंगाचा पत्रसंग्रह) |
| १९. | अखबरात | मुघल दरबारातील दैनंदिन घडामोडींच्या नोंदी |
| २०. | शिवराजभूषण (हिंदी) | कवी बुंदेला |
| २१. | छत्रप्रकाश (हिंदी) | लाल कवी |
| २२. | मिर्झा राजे जयसिंगाची पत्रे (राजस्थानी) | मिर्झा राजे जयसिंग |
| २३. | जसवंत सिंगाची पत्रे (राजस्थानी) | जसवंत सिंग |
| २४. | फ्रँकोयो बर्निअर | ट्रॅव्हल्स इन दी मुघल इंपायर (प्रवासवृत्तांत) |
| २५. | मॉन्सरेट | कंमेट्री |
| २६. | सर थॉमस रो | एम्बेसी |
| २७. | पेल्साट | रिमांस्ट्रेट |
| २८. | निकोलस मनुची | स्टोरिओ-डो-मोगर |

### मुघलकालीन इतिहासलेखनातील वैशिष्ट्ये

१. बाबर, जहांगिर या सम्राटांनी स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे.

२. या काळातील इतिहासलेखन फारशी व तुर्की भाषेत केले आहे.

३. या काळातील लेखनातून सामाजिक, आर्थिक, धार्मिक बाबींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

४. इतिहासकारांनी सम्राटांच्या चुकाही दाखविण्यात कोणताही आडपडदा न ठेवता साहसाने लेखन केले आहे.

५. इतिहासकार याच कालखंडातील व अनेक घटनांचे साक्षीदार असल्याने सत्यतेचे प्रमाण अधिक आहे.

६. मुघल काळातील इतिहासकारांची भाषाशैली साधी, सरळ व वाचकांशी प्रामाणिकपणे संवाद साधणारी आहे.

### मुघल इतिहासलेखनातील काही दोष

१. इतिहासकारांना सम्राट त्यांचे कुटुंब, सत्ता संघर्ष व सम्राटाच्या लष्करी हालचालीबाबत कमी माहिती दिसते.

२. इतिहासकार हे सम्राटाचे आश्रित असल्याने त्यांच्या लिखाणात आपल्या सम्राटाची स्तुती तर विरोधकांची निंदा केलेली दिसते.

Scanned with CamScanner

३. इतिहासकारांनी पुरातत्त्वीय साधनांचा फारसा आढावा घेतलेला नाही.

४. इतिहासकारांनी सुफी, शैव, वैष्णव आदी धार्मिक संप्रदायावरती अगदी त्रोटक लिखा केले आहे.

५. मुघल काळातील सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक चळवळीकडे इतिहासकारां दुर्लक्ष केल्याचे दिसते.

६. मुघल कालखंडात कला व स्थापत्य यामध्ये फार मोठी कामगिरी झाली प इतिहासकारांनी त्याची फारशी दखल घेतली नाही.

७. सम्राटाला ईश्वरी अंश समजण्याचा प्रयत्न काही इतिहासकारांनी केलेला आहे.

## १. अबुल फजल

अबुल फजल हा सम्राट अकबराच्या नवरत्न दरबारातील एक होय. फजल हा मुघ कालखंडातील श्रेष्ठ साहित्यिक म्हणून ख्यातकीर्त आहे. त्याचबरोबर तो कुशल राजकारणी मुत्सद्दी, सेनानी व पुरोगामी विचारवंत होय. त्याचा जन्म १४ जानेवारी, १५५१ मध्ये झाला त्याचे वडील शेख मुबारक नागोरी हे पुरोगामी विचारांचे होते. अबुल फजल व अबुल फैजी दोन्ही मुलांचे शिक्षण त्यांनी चांगल्या प्रकारे केले. अबुल फजल हा वयाच्या ५ व्या वर्षीच लि व वाचू शकत होता. यावरून फजलच्या बुद्धीची चमक दिसून येते.

सम्राट अकबराच्या राजदरबारी अबुल फजलचा प्रवेश झाला तो इ.स.१५७४ मध्ये त्याच्या प्रवेशाचा मार्ग सुकर करण्याची कामगिरी त्याचा भाऊ फैजी याने पार पाडली. अबु फैजी हा अकबराच्या नवरत्न दरबारातील एक होय. तो नामवंत कवी होता. अबुल फजल आपल्या कर्तबगारीची चुणूक दाखविली आणि यातून अबुल फजलला अनेक संधी मिळ गेल्या. इ.स.१५८६ मध्ये दिल्ली प्रांताच्या दिवाणपदाची धुरा त्याच्यावर आली. सम्रा अकबराचा राजनैतिक पत्रव्यवहार पार पाडण्याची जबाबदारी त्याच्यावर आली. फजल आपल्य कर्तृत्वाने पंचहजारी मनसबदार झाला.

सम्राट अकबर हा धर्मसहिष्णू होता. याच मुघल कालखंडात समाज धार्मिकदृष्ट्या संवेदनशील होता. सर्व धर्मपंडितांचा सुसंवाद साधण्यासाठी अकबर दर गुरुवारी धार्मिक विषयांव वादविवाद घडवून आणत असे. इस्लाम धर्मामध्ये कुराणनिष्ठ धर्मांध उलेमांचे वर्चस्व होते उलेमा धर्मशास्त्रात पारंगत होते. उलेमांचा धार्मिक न्याय-निवाडा मुस्लीम समाजाला मान करावा लागे. अनेक वाद-विवादांत अबुल फजलने आपली बौद्धिक चमक दाखवून उलेमांन पराभूत केले होते. कुराणास अनुसरून धार्मिक परिवर्तन करण्याचा अकबराचा मनसुभा उलेमांन मान्य करावा लागला. अकबराच्या धर्मसहिष्णू धोरणाची सर्व धुरा अबुल फजल व त्याचा भाउ अबुल फैजी यांच्यावर होती.

### अकबरास सर्वोच्च धर्मगुरुपदप्राप्ती

अनेक हिंदू सरदार हे अकबराच्या साम्राज्याचे पाईक होते. आपल्या साम्राज्याचा गाड सुरळीत चालविण्यासाठी हिंदू धर्मीयांशी सलोख्याचे धोरण ठेवणे आवश्यक आहे याची जाणीव



सम्राटास होती. पण उलेमांचा कडवेपणा यास आड येत होता. इस्लाम धर्माची मौलवींच्या नियंत्रणातून मुक्तता करण्यासाठी अकबराने काही निर्णय घेतले. शेख मुबारकनेही अकबरास अनुमती दिली आणि यानुसार २२ जून, १५७९ ला फतेपूरसिक्रीमधील मशिदीच्या इमामास पदभ्रष्ट करण्यात आले. यानंतर अकबराने अबुल फैजीकडून काव्यबद्ध केलेला खुत्बा वाचला व पुढे सप्टेंबर, १५७९ रोजी 'इमाम-ए-आदिल' (सर्वोच्च धर्मगुरुपद) साठी धर्मज्ञतेची घोषणा केली आणि यानुसार धार्मिक बाबतीत निरंकुश अधिकार मिळाले. धार्मिक सत्ताकेंद्रात बदल झाला व सम्राट अकबराच्या हाती राजकीय व धार्मिक अधिकार एकवटले गेले. अकबराने मात्र या अधिकाराचा वापर विधायक मार्गाने केला. त्याने अबुल फजलबरोबर चर्चा करून 'दीन-ए-इलाही' नावाचा नवीन धर्मपंथ स्थापन केला. अबुल फजलच्या 'आइन-ए-अकबरी' या ग्रंथामध्ये दीन-ए-इलाही या नवीन धर्मपंथाची तत्त्वे व आचारसंहिता देण्यात आली आहे.

उलेमांच्या हातून धार्मिक सत्ता गेल्यामुळे ते अस्वस्थ झाले. त्यातच अकबराच्या 'दीन-ए-इलाही' या नवीन धर्मपंथामुळे तर ते कमालीचे असंतुष्ट झाले. अबुल फजल व अबुल फैजी यांच्यामुळे हे सर्व घडून आले आहे असे उलेमांचे मत बनले व आपल्या मार्गातील हे अडसर दूर करण्याचा ते विचार करू लागले.

### अबुल फजलचा धर्मांधाकडून खून

सम्राट अकबराची धर्मसहिष्णुता अनेक धर्मांध मुस्लिमांना सहन झाली नाही. अकबराच्या धार्मिक धोरणामध्ये त्यास सर्वतोपरी मदत करणारा अबुल फजल याचा पाडाव करण्याचा कट रचण्यात आला. या कटामध्ये राजपुत्र सलीम ऊर्फ जहांगिरही सहभागी झाला. कारण वारसा युद्धामध्ये आपला विरोधक असणारा अबुल फजल जिवंत असेपर्यंत आपणास मुघल गादी मिळणार नाही असे सलीमला वाटत होते. अबुल फजल केव्हा आपल्या जाळ्यात सापडतो याचाच ते विचार करत होते. इ.स. १२ ऑगस्ट, १६०२ मध्ये अबुल फजल उज्जयनीहून आग्र्यास येत असता मार्गामध्ये ओच्छा संस्थानच्या जंगलामध्ये राजपुत्र सलीमचा सहकारी असणारा ओच्छाचा राजा वीरसिंहदेव बुंदेला याच्या लोकांनी अबुल फजलला पकडले व त्यास ठार केले. फजलच्या देहाची विटंबना करण्यात आली. सलीमच्या आदेशानुसार त्याचे डोके गलिच्छ जागी टाकण्यात आले. अबुल फजलच्या हत्येमुळे सम्राट अकबर मनस्वी दुःखी झाला.

### अबुल फजलची ग्रंथसंपदा

अबुल फजलने आपल्या पांडित्याची छाप अकबरावर पाडली. अकबराविषयी त्यास फार प्रेम होते. मुघल साम्राज्याविषयी तळमळ होती. अबुल फजलच्या ठायी असणारे गुण हेरून अकबराने त्यास मुघल साम्राज्याचा इतिहास लिहिण्याची कामगिरी सोपविली. फजलने ही कामगिरी मोठ्या परिश्रमाने पार पाडली. त्याने अकबरनामा, आइन-ए-अकबरी, रिसालये मुनाजात, जामेयल्लूगात, मकतूबाते अल्लामी इत्यादी ग्रंथ लिहिले.

अबुल फजलचा '**अकबरनामा**' हा प्रमुख ग्रंथ होय. हा ग्रंथ अकबरास अनेक खंडांत लिहावयाचा होता पण तो या ग्रंथाचे तीन भाग पूर्ण करू शकला. पैकी पहिल्या खंडामध्ये

तैमूरपासून हुमायून पर्यंतच्या मुघलांचा इतिहास कथन केला आहे. बाबर भारतात येण्या कारणे, पहिले पानिपतचे युद्ध व दिल्लीवर मुघल सत्तेची स्थापना, हुमायूनच्या जीवनाती अडचणी अबुल फजलने दिलेल्या आहेत. अकबरपूर्व इतिहास जाणून घेण्यासाठी हा विभा महत्त्वाचा आहे.

दुसऱ्या विभागात सम्राट अकबराची कारकीर्द रेखाटली आहे. अकबराप्रती अबुल फजलच्य निष्ठा एकवटल्या होत्या. सम्राटाचे महानत्व रंगविण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. या दुसऱ्या भागामध्येच इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान यासंबंधीचे विवेचन त्याने केले आहे. अबुल फजलच्य मृत्यूपर्यंतचा इतिहास या खंडामध्ये रेखाटण्यात आला आहे.

तिसरा भाग हा 'ऐन-ए-अकबरी' म्हणून ओळखला जातो. या ग्रंथाचे पाच भाग पाडण्या आले आहेत. पहिल्या दोन भागांमध्ये मुघल सम्राट, त्याचा राजपरिवार दरबार इत्यादींचे वर्ण करण्यात आले आहे. तिसऱ्या भागामध्ये न्यायखाते व महसूल व्यवस्थेचे वर्णन करण्यात आले आहे. तर चौथ्या भागामध्ये हिंदूंचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन रेखाटण्यात आले आहे पाचव्या भागामध्ये मुघल काळातील समाजजीवन रेखाटण्यात आले आहे. अबुल फजलने 'आइन-ए-अकबरी' ग्रंथ इ.स.१५९८ मध्ये लिहून पूर्ण केला.

अबुल फजलने इतर अनेक ग्रंथ लिहिले. 'मकतूबाते अल्लामी' हा ग्रंथ म्हणजे फजलच्या पत्रांचा संग्रह आहे. तसेच त्याने ईश्वर उपासनेवर 'रिसालये मुनाजात' हा ग्रंथही लिहिला आहे. नाईलाजास्तव का होईना महाभारताचे फारशी भाषांतरही त्याने केले आहे.

## ऐतिहासिक साधनांसंबंधी अबुल फजलचे विचार

अबुल फजलने आपल्या इतिहासलेखनात प्राथमिक साधनांना महत्त्वपूर्ण मानले आहे. सम्राट अकबरानेच त्याच्यावर इतिहासलेखनाची जबाबदारी सोपविल्याने त्यास दरबारी कागदपत्रांचा, फर्मान, इनाम, वतने, अधिकारपत्रे यांचा अभ्यास करता आला. अबुल फजलही एकाच साधनावर अवलंबून राहात नसे. तो अनेक पुराव्यांचा, कागदपत्रांचा अभ्यास करताना दिसतो. अनेक अधिकारी, सरदार व अनुभवी व्यक्तींच्याकडून तो माहिती मिळवित असे. घटना पडताळून पाहूनच तो त्याचा स्वीकार करत असे. लिखाण करण्यापूर्वी ती माहिती अकबरापुढे तो ठेवत असे. अबुल फजलच्या या लेखन पद्धतीबद्दल Historians of Medieval India या ग्रंथामध्ये **एन.ए.सिद्दिकी** म्हणतात की, ''अबुल फजल हा मध्ययुगातील पहिला इतिहासकार होय की ज्याने प्राथमिक साधनांना महत्त्व दिले आहे.''.

'अकबरनामा' या ग्रंथामध्ये इतिहासासंबंधी विवेचन केले आहे. इतिहास म्हणजे पौराणिक कथा अशी त्याची सुरुवातीस धारणा होती. पण पुढे अनेक गोष्टींच्या अभ्यासाअंती इतिहासाचा व्यापक अर्थ त्यास उमगला. इतिहासाच्या अभ्यासासाठी साधने अतिशय महत्त्वपूर्ण आहेत असे तो सांगतो. इतिहासाच्या अभ्यासातून मानवाच्या दुःख व वेदना कमी होऊन त्यास भविष्याची वाटचाल सुकरपणे करता येते असे अबुल फजल म्हणतो. अनेक ग्रंथांमधील त्रुटी लक्षात आल्याने त्या टाळण्याचा प्रयत्न अबुल फजलने आपल्या ग्रंथात केलेला आहे. राजकीयदृष्ट्या तो निष्पक्षपाती होता. तर धार्मिकदृष्ट्या तो धर्मनिरपेक्ष होता. एखाद्या बाबींचा चौकसपणे अभ्यास



करणे हा फजलचा गुण होता. इतिहासकार **एन.ए.सिद्दिकी** म्हणतो, ''मूळ साधनांचे महत्त्व विचारात घेणारा, एखादी घटना जाणून घेण्यासाठी विभिन्न व विरोधी साधनांचा अभ्यास करून तर्काच्या कसोटीवर सत्य-असत्य शोधून काढण्याचा प्रयत्न करणारा मध्ययुगीन भारतातील पहिला इतिहासकार म्हणजे अबुल फजल होय''.

अबुल फजलने लिहिलेला 'अकबरनामा' व 'आइन-ए-अकबरी' या ग्रंथ लिखाणासाठी त्याने अनेक संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला आहे. पण या ग्रंथांचा कृतज्ञतेने उल्लेख करण्यास मात्र तो विसरलेला दिसतो. अल्बेरुनीच्या भारतातील प्रवासवर्णनातील अनेक उतारे फजलने जसेच्या तसे दिलेले आहेत. त्याचबरोबर बाबरनामा, तुझुक-ए-बाबरी व मनुस्मृती या ग्रंथांमधूनही फजलने अनेक उतारे घेतले आहेत. मात्र या ग्रंथांचा उल्लेख अबुल फजलने जाणीवपूर्वक टाळला आहे. असे अनेक दोष फजलच्या लिखाणात असले तरीही अनेक साधनांचा आधार घेऊन मोठ्या कष्टाने त्याने केलेले लिखाण महत्त्वपूर्ण आहे.

अबुल फजलने अकबरनामा ग्रंथात अनेक महत्त्वपूर्ण विधाने केलेली आहेत. पण लिखाणामध्ये त्यात विसंगती आढळून येते. आइन-ए-अकबरीमध्ये फजल म्हणतो इतिहास म्हणजे जगातील घटनांचा कालानुक्रम आलेख आहे. पण जगभरातील कोणतीही घटना या ग्रंथात येत नाही. विविध घटनांचा संग्रह म्हणजे इतिहास अशी फजलची भावना होती परंतु अबुल फजलने अप्रिय घटना टाळण्याचा प्रयत्न केला आहे आणि ज्या घटना दिलेल्या आहेत त्यांचा संबंध इतर बाबींशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. बैरामखानाच्या हत्येसंदर्भात तो म्हणतो त्याच्या दुष्कृत्याचे त्यास फळ मिळाले. फजलने अकबराच्या चरणी आपले सर्वस्व अर्पण केले होते. तो अकबराचा स्वामिभक्त होता. तो म्हणतो, जो अकबराच्या विरुद्ध जाईल त्यास त्याच्या कर्माचे फळ मिळेल. अकबराचे असामान्यत्व फजलने अकबरनामा व आइन-ए-अकबरी या ग्रंथांत मांडले. अकबर व कट्टर इस्लाम धर्मीयांच्यातील संघर्षात मोठ्या निर्धाराने फजलने अकबराची पाठराखण केली. मुघल कालखंडामधील इतिहास म्हणजे हिंदू-मुस्लीम यांच्यातील संघर्ष नसून मुघल राज्य हे महत्त्वपूर्ण भारतीय राज्य होते व त्यास हिंदू धर्मीयांचा (रजपूत) पाठिंबा होता असे अबुल फजल म्हणतो. त्याच्या लिखाणामध्ये कोठेही धार्मिक कट्टरता दिसून येत नाही. यावरून सम्राट अकबराच्या धर्मसहिष्णुतेच्या धोरणाचा त्याच्यावर प्रभाव दिसून येतो.

अबुल फजलने वस्तुनिष्ठ लिखाण केले आहे असे आपणास म्हणता येणार नाही. कारण उलेमांचे वर्चस्व नष्ट करण्यात सम्राटास त्याने सर्वतोपरी प्रयत्न केला होता. एवढेच नव्हे तर मुघल सत्ता खंडित करून अफगाणांची सत्ता दिल्लीवर स्थापन करणाऱ्या शेरशहाच्या सर्व कामगिरींची तो निर्भत्सना करतो. अकबराच्या विजयास त्याचे सौभाग्य कारणीभूत होते असे फजल म्हणतो. युद्धामधील विजय केवळ सौभाग्यावर अवलंबून नसून त्यासाठी कष्ट, परिश्रम, डावपेच व लष्करी तयारी या गोष्टींची आवश्यकता असते. या गोष्टींची फजलला भूल पडली असावी.

Scanned with CamScanner

अबुल फजलच्या ग्रंथामध्ये अनेक दोष असले तरीही तत्कालीन परिस्थितीत त्याने मुघल कालखंडाचा इतिहास शब्दबद्ध करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य तडीस नेण्याचा प्रयत्न केला आहे. स्वकर्तृत्वाने अकबराच्या दरबारात त्याने आपले स्थान निर्माण केले होते. अकबराचे ग्रंथ अनेक इतिहासकारांना मार्गदर्शक ठरले आहेत. अनेक इतिहासकारांनी फजलच्या कामगिरीची प्रशंसा केली आहे. अबुल फजल हा मुघल कालखंडातील अव्वल दर्जाचा इतिहासकार मानला जातो.

**इतिहासकारांनी अबुल फजलचे केलेले मूल्यमापन**

**डॉ. पी. शरण** म्हणतात, ''अबुल फजलची आलंकारिक भाषा व खोटी स्तुती हे दोन मुद्दे बाजूस ठेवूनही अकबराच्या प्रशासनयंत्रणेचा क्रमशः विकास कसा झाला हे जाणून घेण्यासाठी 'अकबरनामा' उपयुक्त ग्रंथ आहे''.

प्रसिद्ध इतिहासकार **मोरलँड** म्हणतात, 'अकबरनामा' हा प्रामाणिक ग्रंथ नाही तर तो अबुल फजलचा चाटुकारितापूर्ण ग्रंथ आहे'.

**डॉ. अवधबिहारी पांडे** 'अकबरनामा' या ग्रंथाबाबत म्हणतात, 'आशिया अथवा युरोपातही अशा ग्रंथाची रचना झालेली नाही'.

**ब्लौचमन** म्हणतात, 'भिन्न-भिन्न प्रकारच्या अभ्यासाचा खजिना म्हणजे हा ग्रंथ होय'

**के.एम.अशवरफ**च्या लिखाणानुसार 'आइन-ए-अकबरी' हा ग्रंथ सामाजिक इतिहासाचे प्रतिक आहे.

**व्ही.एम.स्मिथ** म्हणतात, 'अबुल फजल आपला नायक अकबराचा लज्जाहीन चाटुकार (स्तुतिपाठक) असून केव्हा केव्हा सत्य लपविण्याचा व विकृत पद्धतीने लिखाण करण्याचा प्रयत्न केला असला तरी हा ग्रंथ सम्राट अकबराच्या शासनकाळाच्या इतिहासाची आधारशिला मानली जाते'.

## २. अब्दुल कादीर बदायुनी

मुघल कालखंडातील महत्त्वपूर्ण इतिहासकारांत बदायुनीचा उल्लेख करावा लागतो. इ.स.१५४० मध्ये अब्दुल कादीर बदायुनी याचा जन्म बदायूं (उत्तर प्रदेश) या ठिकाणी झाला. त्याचे वडील शेख मुलूकशहा यांनी त्याच्या शिक्षणाची व्यवस्था केली. अनेक विद्वानांचे त्यास मार्गदर्शन लाभले. यामुळे बदायुनी इतिहास, ज्योतिषशास्त्र व संगीत यामध्ये पारंगत झाला. शेख हातीम, मुबारक हुसैनखाँ इत्यादी कट्टर इस्लाम धर्मीयांचा सहवास त्यास लाभला. यामुळे बदायुनी कट्टर इस्लाम धर्मीय बनला.

**बदायुनीची ग्रंथसंपदा**

१. मुन्तखब-उल-तवारिख (तीन खंड)
२. रज्मनामा (महाभारताचे फारशी भाषांतर)
३. रामायणाचा अनुवाद (रामायणाचे फारशी भाषांतर)
४. तारिखे अलफी
५. नजात् रशीद
६. नामए खिरद अफजा
७. तमुगये तारीखे काश्मीर



बदायुनीच्या ग्रंथरचनेपैकी 'मुन्तखब-उल-तवारिख' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. मुघल कालखंडाचा इतिहास जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे. याचे तीन खंड याप्रमाणे आहेत -

१. भाग पहिला : सुबक्तगीन ते हुमायूनच्या अखेरीपर्यंतचा इतिहास
२. भाग दुसरा : सम्राट अकबराचा इतिहास
३. भाग तिसरा : सुफी शायर व विद्वानांच्या कारकिर्दीचा आढावा.

मुन्तखब-उल-तवारिख म्हणजे मुघल काळाचा महत्त्वाचा दस्तऐवज होय. मुघल सत्तेची स्थापना, तिची वाटचाल बाबर व हुमायूनच्या जीवनाचा आढावा या ग्रंथात घेण्यात आला आहे. अकबर काळाचा इतिहास कथन करणे हा तर या ग्रंथाचा मुख्य हेतू आहे. अकबराची राजकीय कारकीर्द, त्याची प्रशासन व्यवस्था तसेच त्याचा पुरोगामी दृष्टिकोण व धर्मनिरपेक्षता या बाबींचा आढावा बदायुनीने आपल्या ग्रंथात घेतला आहे.

इ.स.१५७४ पासून बदायुनी सम्राट अकबराच्या सहवासात होता. सम्राटाच्या धर्मसभेमध्ये त्यास संधी मिळाली. नमाज पडण्यासाठी इमाम म्हणून त्याची नियुक्ती झाली होती. सम्राट अकबराचे उदार धार्मिक धोरण, धार्मिक सहिष्णुता, हिंदूप्रती असणारी आपुलकी, जिव्हाळा या सर्व गोष्टी बदायुनीस मनोमन खटकल्या. अकबराचे धार्मिक धोरण इस्लामविरोधी आहे. इस्लाम धर्माची यामुळे प्रचंड हानी होत आहे. तसेच बिगर मुस्लिमांना शासनात उच्च पदे देण्याच्या अकबराच्या धोरणामुळे मुस्लिमांवर अन्याय होतो आहे. मुस्लीम शासनातील उच्च पदाचे दावेदार असताना त्यांना डावलण्यात येत आहे. अशी प्रखर टीका बदायुनीने केली आहे.

अब्दुल कादीर बदायुनीस अकबराने अनेक संस्कृत ग्रंथांचे फारसीत रूपांतर करण्याचे काम सोपविले. बदायुनी हा धर्मांध सुन्नीपंथीय होता. त्यामुळे ही कामगिरी त्यास आवडली नाही. नाईलाजास्तव त्याने हे केले. महाभारताचे भाषांतर करताना बदायुनीने अश्रू ढाळले. कारण हिंदू देवदेवतांची नावे त्यास आपल्या हाताने लिहावी लागली. बदायुनीची कट्टर धार्मिकता त्याच्याच विकासातील अडथळा ठरली.

अबुल फजल व अब्दुल कादीर बदायुनी हे दोघेही अकबराच्या दरबारातील लेखक होते. दोघांचाही कालखंड एकच असला तरीही दोघांच्यात फार मोठा फरक होता. अबुल फजलची भाषाशैली अत्यंत साधी सरळ व सुंदर होती. सम्राट अकबराशी त्याची निष्ठा एकवटली होती. लिखाणामध्ये तो अकबराची स्तुती करतो. अकबर आणि कट्टर इस्लामचा पुरस्कार करणारे उलेमा यांच्यातील संघर्षात अबुल फजल अकबराच्या पाठीशी उभा राहिला. अबुल फजलच्या या भूमिकेमुळे तो पंचहजारी मनसबदार होऊ शकला. फजलच्या तुलनेमध्ये बदायुनीची भाषाशैली दुय्यम वाटते. बदायुनी कट्टर सुन्नीपंथीय असल्याने अकबराच्या धर्मसहिष्णू धोरणावर त्याने टीका केली. बदायुनीकडे दूरदृष्टीचा अभाव आल्यामुळे तो आपली प्रगती करू शकला नाही. अबुल फजलकडे लष्करी नेतृत्व करण्याची क्षमता होती याचाही बदायुनीकडे अभाव होता. परिणामतः अबुल फजलचा तो द्वेष करू लागला. अबुल फैजी व अबुल फजल यांच्या दरबारातील प्रभावामुळे आपणास बढती मिळत नाही असे बदायुनीस वाटत होते.

Scanned with CamScanner

### अब्दुल कादीर बदायुनीच्या लिखाणाचे मूल्यमापन

सम्राट अकबराच्या पदरी लेखक म्हणून असतानाही अकबराच्या धार्मिक धोरणावर टीक करण्यास बदायुनीने मागे पुढे पाहिले नाही. बदायुनीच्या धाडसाचे कौतुक करावेसे वाटते प त्याचा दृष्टिकोण सदोष होता. जहांगिरने तर 'मुन्तखाब-उल-तवारिख' हा ग्रंथ नष्ट करण्या प्रयत्न केला होता. पण त्यात त्यास यश मिळाले नाही.

बदायुनी कट्टर सुन्नीपंथीय असल्याने त्याचा पगडा त्याच्या लिखाणावर होता. बदायुनीच्य लिखाणामधून सुन्नीपंथियांची विचारधारा कळण्यास मदत होते. त्याचबरोबर त्याच्य लिखाणामधून सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थिती कळण्यास मदत होते.

**डॉ. व्ही. ए. स्मिथ** म्हणतात की, 'बदायुनीच्या पुस्तकामुळे राजाला खुश करण्यासा केल्या जाणाऱ्या इतिहासलेखनाला काही काळ रोखले'.

## ३. अब्दुल हमीद लाहोरी

शहाजहान बादशहाच्या कालखंडात मुघल साम्राज्य वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होते राजकीय स्थैर्य व शांतता, आर्थिक समृद्धी, व्यापारात भरीव प्रगती तर कला, साहित्य व स्थापत्य यात आमूलाग्र बदल होऊन भरभराट झाली होती. आपल्या या सर्व परिस्थितीचे चित्रण शब्दब व्हावयास हवे असे शहाजहान यास वाटू लागले. अबुल फजलने जसा 'अकबरनामा' लिहिल त्या प्रकारे आपल्या कालखंडावर एखादा ग्रंथ असावयास हवा असे शहाजहानला वाटू लागले

बादशहास अल्लानी मदुलाखाँ नावाच्या सरदाराने अब्दुल हमीद लाहोरीच्या नावाच शिफारस इतिहास लेखनासाठी केली. बादशहाने लाहोरीस इतिहास लेखनाबाबत सुचविले याबाबत लेखक **लाहोरी** म्हणतो की, 'बादशहा अशा लेखकाच्या शोधात होता जो त्याच्या शासन काळाच्या आठवणी लिहू शकेल व ज्याची शैली अबुल फजलने लिहिलेल्या 'अकबरनामा' प्रमाणे असेल'.

अब्दुल हमीद लाहोरी याने अनेक कागदपत्रांचा अभ्यास करून, शासकीय दप्तर पाहून, अनेक फारशी संदर्भ ग्रंथांचा मागोवा घेऊन शहाजहान बादशहाच्या कालखंडावर 'पादशहानामा' नावाचा ग्रंथ लिहिला. अकबरनामाप्रमाणे आपला ग्रंथ व्हावा अशी लेखकाचीही इच्छा होती. अबुल फजलच्या लिखाणाचा लाहोरीवर प्रभाव पडला होता. 'अकबरनामा' या ग्रंथाचा आधार म्हणूनही लेखकाने उपयोग केल्याचे दिसते. 'पादशहानामा' ग्रंथात शहाजहानच्या पहिल्या वीस वर्षांचा इतिहास येतो व या ग्रंथाचे दहा दहा वर्षांचे असे दोन खंड पाडण्यात आले आहेत.

### पादशहानामा या ग्रंथाचा कथनविषय

१. अब्दुल हमीद लाहोरीने इ.स. १६४८ मध्ये 'पादशहानामा' हा ग्रंथ पूर्ण केला. शहाजहानच्या सुवर्णयुग समजल्या जाणाऱ्या कालखंडावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणून या ग्रंथाचा उल्लेख करावा लागतो.

२. तैमूरपासून शहाजहानपर्यंत सर्व मुघल वंशाचा इतिहास लाहोरीने दिला आहे. हा इतिहास संक्षिप्त असला तरी त्यात सुसूत्रता आहे.



954.025
SHI
VIVE... Acc. No. ... Date 8 SEP 2012 48959 KOLHAPUR

३. शहाजहानच्या प्रारंभीच्या २० वर्षांचा इतिहास लाहोरीने देण्याचा प्रयत्न केला आहे. याचे १० वर्षांचा पहिला व उर्वरित १० वर्षांचा दुसरा कालखंड पाडण्यात आला आहे.

४. शहाजहानच्या शेवटच्या १० वर्षांचा इतिहास 'पादशहानामा' या ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात मोडतो. मात्र हा तिसरा खंड लाहोरी वृद्धत्वामुळे लिहू शकला नाही. त्याने आपले अपूर्ण काम मुहम्मदवारिस याच्याकडे सोपविले. या तिसऱ्या खंडामध्ये शहाजहानाबाद शहरातील स्थापत्याचा आढावा घेतला आहे. बादशहाच्या दरबारातील अनेक विद्वानांचा मागोवा घेतला आहे.

५. शहाजहानची कारकीर्द मोठी आहे आणि या काळात अनेक क्षेत्रांत भरीव स्वरूपाचे काम उभे राहिले. हा काळ मुघल बादशाहीच्या भरभराटीचा काळ होता आणि हे सर्व पादशहानामामधून चित्रित झाले असे म्हणता येणार नाही. लाहोरीने आपल्या ग्रंथात ९ हजार मनसबदारांपासून ते ५०० पर्यंतच्या मनसबदारांची माहिती दिली आहे. तसेच मुघल दरबारातील कवी, विद्वान, वैद्य, इस्लाम साधू यांची माहितीही दिलेली आहे.

### पादशहानामा ग्रंथातील दोष

१. लेखक अब्दुल हमीद लाहोरीने बादशहा शहाजहानची फार प्रशंसा केली आहे. यामुळे अनेक बाबींना बाधा येते.

२. लेखकाने राजा त्याचा राजपरिवार यावरच फार लक्ष दिलेले दिसते. त्यामुळे त्याच्या लिखाणास व्यापकता प्राप्त होत नाही.

३. शहाजहानच्या कालखंडात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक आदी क्षेत्रांत मोलाची भर पडली. पण या बाबींचा या ग्रंथामध्ये सविस्तर वृत्तांत नाही.

४. स्थापत्याच्या बाबतीत तर शहाजहान वैभवाच्या शिखरावर होता. अनेक उत्तुंग इमारती त्याने उभ्या केल्या पण शहाजहान काळाचा मागोवा घेणाऱ्या 'पादशहानामा' या ग्रंथात यांची त्रोटक माहिती मिळते.

लाहोरीच्या पादशहानामा या ग्रंथामध्ये अनेक दोष आहेत. त्याची भाषाशैली मधुर, रंजक नाही. तरीही शहाजहान काळाचा इतिहास समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरतो.

## ४. फ्रान्सिस बर्नियर

मुघल कालखंडामध्ये परकीय प्रवासी भारतात येऊन गेले. त्यांनी आपली प्रवासवर्णने लिहिली आहेत. या प्रवासवर्णनामधून मुघल काळाची महत्त्वपूर्ण माहिती पुढे आली आहे. फ्रान्सिस बर्नियरचे प्रवासवर्णन मुघल काळाचा इतिहास जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरते. जन्माने फ्रेंच असणाऱ्या बर्नियरचा जन्म इ.स. १६२० मध्ये झाला. त्याने डॉक्टर ऑफ मेडिसीन ही वैद्यकीय पदवी घेतली. त्याने इंग्लंड, जर्मनी, पोलंड आदी अनेक देशांना भेटी दिल्या. तो १६५६ मध्ये भारतात आला. तो भारतातील अनेक प्रांतांत फिरला. त्याने सुरत, अहमदाबाद, आग्रा, दिल्ली, बंगाल, मच्छलीपट्टण, गोवळकोंडा, विजापूर, औरंगाबाद असे अनेक प्रदेश स्वतः पायी घातले होते. बर्नियर डॉक्टर असल्याने दाराशिकोहच्या आजारी पत्नीस आपण औषधोपचार केल्याचे तो सांगतो.

Scanned with CamScanner

फ्रान्सिस बर्नियरने इ.स. १६५६ ते १६६८ पर्यंत भारतभर प्रवास केला. इ.स. १६६८ म
तो मायदेशी परतला. बर्नियरने आपल्या भारतातील प्रवासवर्णनावर 'Travells in the Mugh
Empire' हा ग्रंथ लिहिला. फ्रेंच भाषेत असणाऱ्या या ग्रंथाचा इ.स. १६७१ मध्ये इंग्रजी भा
अनुवाद झाला. सर्व युरोपभर या ग्रंथास प्रसिद्धी मिळाली. तो जवळ जवळ दहा भाषांम
भाषांतरित झाला. बर्नियरने अनेक ठिकाणांना भेटी दिल्यानंतर तेथील माहितींची टिपणे काढले
अनेक गोष्टी त्याने स्वतः अनुभवल्या. सम्राट शहाजहानच्या पुत्रांमध्ये चाललेला सत्ता-सं
त्याने पाहिला होता. बर्नियर उच्च शिक्षित होता. त्याची निरीक्षण शक्ती चांगली होती.
कोणाचाही आश्रित नसल्यामुळे त्याच्या लिखाणात वस्तुनिष्ठता पाहावयास मिळते. मु
इतिहास जाणून घेण्यासाठी 'ट्रॅव्हल्स इन मुघल एम्पायर' हा ग्रंथ आवश्यक आहे.

### ट्रॅव्हल्स इन मुघल एम्पायरमधील महत्त्वपूर्ण बाबी

**१. शहाजहानचे पुत्र व मुली याबाबत लिखाण :** फ्रान्सिस बर्नियर भारतात आला
वेळी बादशहा शहाजहानचे पुत्र दारा, शुजा, औरंगजेब व मुराद यांच्यात वारसा युद्ध चालू हो
या काळातील घटनांचे सजीव चित्र बर्नियरने उभे केले आहे. शहाजहानची कैद व सत्तेसा
औरंगजेबाने आपल्या सख्ख्या भावांची केलेली हत्या व सत्ताप्राप्ती अशा अनेक घटनांचे बोल
चित्र बर्नियरच्या प्रवासवर्णनामुळे आपणास पाहावयास मिळाले. सत्ताप्राप्तीसाठी राजपुत्रांम
झालेली युद्धे लेखकाने दिलेली आहेत. शहाजहानने दाराला आपला वारसदार म्हणून घो
केले. यामुळे डिसेंबर, १६५७ मध्ये शहाजहानच्या चार राजपुत्रांमध्ये सत्तेसाठी संघर्ष निर्मा
झाला होता. त्यामध्ये औरंगजेबाने पाशवी मार्गाचा अवलंब करून भावांचीही गय न करता स
मिळविली. याची माहिती या प्रवासवर्णनामधून आपणास मिळते.

बर्नियरने राजपुत्रांबरोबरच राजकन्यांचीही माहिती दिली आहे. तो म्हणतो राजकन्यां
विवाह होत नसत. कारण राजकन्यांबरोबर विवाह करण्यासाठी कोणीही पात्र पुरुष नाही अ
एक समज होता आणि महत्त्वाची बाब म्हणजे राजकन्येचा त्याच्याबरोबर विवाह होई तो सम्राटा
जवळचा नातेवाईक झाल्याने तो सत्तास्पर्धेत उतरण्याची भीती होती. शहाजहानची आवड
मुलगी जहाँआरा हिचा शहाजहानवरील प्रभाव लेखकाने कथन केला आहे. राजकुटुंबातील
व्यक्तींची राहण्या-खाण्याची व्यवस्था, त्यांचे नोकर-चाकर, त्यांचे रीतिरिवाज अशा अनेक
गोष्टींचे वर्णन बर्नियरने आपल्या प्रवासवर्णनात केले आहे.

**२. मनसबदारी प्रथा :** मुघल काळातील मनसबदारी प्रथेचे वर्णन लेखकाने केले आहे.
मनसबदारांना मिळणारी मनसब (तनखा), त्यांना मिळालेले अधिकार, मनसबदारांची मनमानी,
शेतकऱ्यांवर त्यांच्याकडून होणारा जुलूम इत्यादींबाबतची माहिती लेखकाने दिली आहे.
मनसबदार-बादशहा संबंध, अनेक महत्त्वाच्या प्रसंगी एकमेकांना द्याव्या लागणाऱ्या भेटवस्तू,
आर्थिक उत्पन्नाची साधने हाती असूनसुद्धा मनसबदारांचा कर्जबाजारीपणा पाहावयास मिळतो.
बर्नियरने मुघल साम्राज्यातील २० सुभ्यांची नावे दिली आहेत. तो म्हणतो या सुभ्यांमधून २२
कोटी ५९ लाख ४०००० रुपये एवढा महसूल मिळत होता. आर्थिकदृष्ट्या शहाजहानच्या
कालखंडात मुघल साम्राज्य भरभराटीस होते. लोकांना सोन्या-चांदीच्या दागिन्यांची आवड



होती. बादशहाच्या मयूर सिंहासनाची किंमत ४ कोटी रुपये होती असे बर्नियरने वर्णन केले आहे.

**३. काश्मीरबद्दल लिखाण :** शहाजहानची राजधानी असणाऱ्या शहाजहानाबाद (दिल्ली), आग्रा, सुरत इत्यादी शहरांचे वर्णन बर्नियरने दिले आहे. याचबरोबर पंजाब व काश्मीर या प्रांतांनाही लेखकाने भेट दिली होती. काश्मीरच्या निसर्गसौंदर्याने बर्नियर भारावून गेला होता. काश्मीरमधील बगीचे, उद्याने तेथील कलाकुसरीच्या वस्तूंचे वर्णन त्याने केले आहे. काश्मीरी शाली व कलाकुसरींच्या वस्तूंना जगभर मागणी होती. काही शालींची किंमत त्या काळी १५० रुपये होती. राज्यकर्ते, मनसबदार, श्रीमंत यांसाठी त्या बनविण्यात येत होत्या असे बर्नियर म्हणतो. काश्मीरच्या निसर्गसौंदर्याची ओढ भारतीयांप्रमाणे युरोपियनांनाही मध्ययुगीन कालखंडात होती हे यावरून दिसून येते.

**४. शेती व शेतकऱ्यांविषयी बर्नियरचे लिखाण :** बर्नियरने मुघल काळातील शेतकऱ्यांचे जीवन रेखाटले आहे. जमीनदारांकडून शेतकऱ्यांवर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होत होते. शेतकऱ्यांना (कूळ) जमीनदारांच्या, वतनदारांच्या शेतीवर राबावे लागत होते. करांचा बोजा हा राबणाऱ्या शेतकऱ्यांवर पडत होता. दिल्ली, आग्रा परिसरातील जमीनदार आपल्याकडून शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही याची ते दक्षता घेत. कारण आपल्या अन्यायी वर्तनाची बातमी राजाच्या कानावर जाईल व त्याचा आपणास त्रास होईल असे त्यांना वाटे. जमिनीची सुपीकतेनुसार उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी विभागणी केली जाई. जमीन मोजणीसाठी लोखंडी कड्यांनी जोडलेल्या ठरावीक लांबीच्या बांबूचा वापर केला जात असे. मुघल काळात शेतसारा उत्पन्नाच्या एक-तृतीयांश एवढा आकारला जाई आणि हा शेतसारा गोळा करण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे.

**५. उद्योग-व्यापाराबाबत बर्नियरचे लिखाण :** बर्नियरने मुघल काळातील आर्थिक स्थिती, व्यापार, उद्योगधंदे यांचा आढावा घेतला आहे. मुघल काळात शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. गहू, ज्वारी, बाजरी, मका, बटाटा, मिरची, तंबाखू इत्यादी पिके घेतली जात. सरकारपातळीवरील शेती व्यवसायास उत्तेजन दिले जाई. मुघल कालखंडामध्ये कापड उद्योग भरभराटीस आला होता. गुजरात, बंगाल हे प्रांत कापड उद्योगासाठी प्रसिद्ध होते तर रेशीम उत्पादनासाठी पैठण, आग्रा, पटना, खंबायत इत्यादी ठिकाणे प्रसिद्ध होती. मुघल काळात आग्रा ते गोवळकोंडा व सुरत ते काबूल असे हमरस्ते तयार झाले. प्रवाशांच्या विश्रांतीसाठी 'सराया' बांधण्यात आल्या.

मुघल काळामध्ये मुबलक प्रमाणात नाणी पाडण्यात आली. चांदीचा रुपया हे या काळातील प्रसिद्ध चलन होय. याच काळात सुरत, कोचीन, हुगळी अशा बंदरांचा विकास झाला. अनेक व्यापारपेठा उदयास आल्या. भारतातून कापड, लोकरी वस्तू, मसाल्याचे पदार्थ निर्यात होत तर घोडे, सोने, चांदी भारतात आयात केली जात असे. युद्धासाठी आवश्यक असणारे जातिवंत घोडे अरबस्थानमधून भारतात आयात केले जात. मालाची ने-आण करण्यासाठी उंट, घोडे, बैल, गाढवे व बैलगाड्या यांचा वापर होई. समुद्रमार्गेही व्यापार चालू होता. थोडक्यात, १७ व्या शतकात भारताचा अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार वाढीस लागला होता.

**६. राजधानी दिल्लीबाबत बर्नियरचे लिखाण :** शहाजहान बादशहाने शहाजहानाबा येथे नवीन शहर वसविले. आज तो दिल्लीचाच एक भाग आहे. येथे शहाजहानने अने महत्त्वपूर्ण इमारतींचे बांधकाम केले. लाल किल्ला, मोती मशीद, जामा मशीद, दिवाण-इ-आ दिवाण-इ-खास इत्यादी इमारती उभारल्या. दिल्लीच्या वैभवात यामुळे भर पडली. दिल्लीमधे रुंद रस्ते, दिल्लीची तटबंदी, इमारतींची प्रमाणबद्धता व भव्यता त्याचबरोबर सर्वसामान्य लोकांच निवासस्थानांचे वर्णन बर्नियरने केले आहे. तो म्हणतो, दिल्लीत उच्चपदस्थ लोक राहत तसे कनिष्ठ वर्गही होता. मध्यम वर्ग दिल्लीमध्ये नाही असे बर्नियर म्हणतो. परंतु मध्यम वर्गा मोडणारे प्रशासनातील दुय्यम अधिकारी, व्यापारी, कारागीर, छोटे वतनदार यांचे दिल्लीमध वास्तव्य होते.

दिल्लीमधील वरिष्ठ वर्ग श्रमिक, कारागीर यांच्याकडून आपली कामे करून घेत. म त्या कामाचा योग्य मोबदला त्यांना मिळत नसे. कनिष्ठ वर्गातील लोकांचे जीवनमान निकृ दर्जाचे होते. दिल्लीतील व्यवसायात रेशमी कापडनिर्मिती, रंगकाम, विविध प्रकारचे धातूका कलाकुसरीच्या वस्तू, पेंटिंग करणे, पादत्राणेनिर्मिती इत्यादी व्यवसाय भरभराटीत होते अ बर्नियर म्हणतो. दिल्लीमधील धान्यबाजार, मिठाईची दुकाने, पशूंच्या खरेदी-विक्रीची बाजारपे व मांस विक्रीची दुकाने आणि फळबाजार यांचे वर्णन बर्नियरने केले आहे. तो म्हणतो, दिल्लीत फळबाजार पाहून मी आनंदित झालो होतो.

**७. सामाजिक, धार्मिक चालीरीतीसंबंधी बर्नियरचे विचार :** समाजात प्रामुख्यां तीन वर्ग होते. शेतकरी, कारागीर, शेतमजूर, कष्टकरी यांचा तिसरा वर्ग प्रामुख्याने खेडोपाड विखुरला गेला होता. तत्कालीन भारतीय समाजावर अंधश्रद्धेचा पगडा असलेला दिसतो शिक्षणव्यवस्था ही धर्माच्या ताब्यात होती. धार्मिक शिक्षण प्रामुख्याने देण्यात येत होते. रूढी-परंपरांचे समाजावर प्राबल्य होते. कर्मकांडांचे व आचारधर्माचे प्रस्थ वाढले होते. स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जाचे स्थान होते. हिंदू धर्मामधीलही अनेक बाबींवर बर्नियरने आपली मते मांडली आहेत. तो म्हणतो, ब्राह्मण पुरोहितवर्गाने अनेक अनिष्ट रूढी परंपरांना चालना देऊन स्वतःचा स्वार्थ साधला होता. हिंदू धर्मात असणाऱ्या सती-प्रथेवरही बर्नियरने लिहिले आहे. हिंदूमध्ये मरणोत्तर प्रेत दहन केले जाई. गंगा नदीस पवित्र समजले गेल्याने प्रेत गंगासमर्पण करण्याची पद्धतही असल्याचे तो म्हणतो. हिंदू-मुस्लिमांचे सण-समारंभ, मनोरंजनाची साधने, वेशभूषा अशा अनेक गोष्टींची माहिती बर्नियरने आपल्या 'ट्रॅव्हल्स इन मुघल एम्पायर' या प्रवासवर्णनात दिली आहे.

### बर्नियरच्या लिखाणाचे मूल्यमापन

१. बर्नियरने मुघलकालीन भारतीय समाजव्यवस्थेवर भाष्य केले आहे. तो परकीय असल्याने हिंदू-इस्लाम यांच्यामधील चालीरीतींची त्यास बारकाईने माहिती नव्हती. त्यामुळे त्याने दिलेली धर्म, सण-समारंभ, कर्मकांड यांची माहिती वरवरची वाटते. हिंदूचे धर्मशास्त्र जाणून घेण्यासाठी त्याने इस्लाम मौलवीकडून माहिती मिळविली व त्या आधारावर लेखन केले आहे.



२. बर्नियरच्या मते, वैज्ञानिकदृष्ट्या भारतीय पाश्चात्त्यांच्या कितीतरी पाठीमागे आहेत. भारतीयांना चांगल्या प्रकारचे भौगोलिक ज्ञान नाही.

३. दिल्लीमध्ये दोनच सामाजिक वर्ग आहेत. एक वरिष्ठ मनसबदार व दुसरा कनिष्ठ वर्ग पण बर्नियरचे हे विधान सदोष आहे.

४. सर जदुनाथ सरकार म्हणतात की, बर्नियरने लोकगाथांचा आधार घेतला. राजदरबारी कागदपत्रे त्यास हाताळता आली नाहीत. त्यामुळे त्याचे लिखाण व तत्कालीन परिस्थिती यामध्ये काही ठिकाणी विसंगती असल्याचे दिसते.

सम्राट शहाजहान, औरंगजेब यांच्या कालखंडात आलेला फ्रेंच प्रवाशी फ्रान्सिस बर्नियर याने आपल्या प्रवासवर्णनात अनेक बाबींचा आढावा घेतला आहे. तो कोणाच्याही अंकित अगर आश्रित नसल्यामुळे त्याचे लिखाण वस्तुनिष्ठ आहे. मात्र त्यात अनेक त्रुटी आहेत हेही आपणास मान्य करावे लागते. असे असले तरी बर्नियरचा 'Travells in the Mughal Empire' हा ग्रंथ मुघलकालीन इतिहासाचा महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

### वस्तुनिष्ठ प्रश्न

१. बाबराने .... भाषेत आत्मचरित्र लिहिले आहे.
(अ) फारसी (ब) तुर्की (क) उर्दू (ड) अरबी

२. अकबरनामा या ग्रंथाचा लेखक .... हा होय.
(अ) अबुल फजल (ब) बदायुनी (क) साकी मुस्तैदरवान (ड) खाफीखान

३. मासिर आलमगिरी चा ग्रंथाचा कर्ता .... हा होय.
(अ) ईश्वरदास नागर (ब) अबुल फजल
(क) साकी मुस्तैदखान (ड) मुहंमद वारीस

४. मुन्तखवुललुबाबए महंमदशाही या ग्रंथाचा कर्ता .... हा होय.
(अ) महंमद वारीस (ब) गुलाम हुसेन (क) खाफीखान (ड) अझुबैरी

५. तारीखे दिल्कुशा हा ग्रंथ .... ने लिहिला.
(अ) ईश्वरदास नागर (ब) खाकी खान
(क) इरादतखान (ड) भीमसेन सक्सेना

६. कुतूहाते आलमगिरी या ग्रंथाचा कर्ता .... हा होय.
(अ) खाफीखान (ब) ईश्वरदास नागर
(क) भीमसेन सक्सेना (ड) गुलाम हुसेन

७. छ. राजाराम महाराजांनी रामचंद्रपंत अमात्य यांस .... हा किताब देऊन गौरविले.
(अ) हुकूमत पन्हा (ब) कृष्णाजी (क) चंद्रराव (ड) सरखेल

Scanned with CamScanner